# भाजप जे बोलतो ते करून दाखवतो –जे.पी. नड्डा



**नवी दिल्ली :** भाजपच्या स्थापना दिनानिमित्त राजधानी दिल्ली येथील मुख्यालयात पक्षाध्यक्ष आणि केंद्रीय मंत्री जे.पी. नड्डा यांनी रविवारी (दि. ६) पक्षाचा ध्वज फडकावला तसेच डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी आणि दीनदयाळ उपाध्याय यांच्या प्रतिमेला अभिवादन केले. यानंतर त्यांनी कार्यकर्त्यांना संबोधित केले. नड्डा म्हणाले की, आम्ही राम मंदिर बांधण्याचे वचन दिले होते आणि ते आम्ही पूर्ण केले. कलम ३७० रद्द करण्याचे आश्वासन दिले आणि ते पूर्ण केले. भाजप जे बोलतो तो करते. त्यामुळेच केंद्रासह विविध राज्यांमध्ये आपल्याला पुन्हा सरकार स्थापन करता येत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या दशकभरातील यशस्वी नेतृत्वाचा विशेष उल्लेख त्यांनी केला. या कार्यक्रमास भाजपचे संघटन महासचिव बी.एल. संतोष, दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता, प्रदेशाध्यक्ष विरेंद्र सचदेवा, खासदार, आमदार, पदाधिकारी उपस्थित होते.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक २५९

www.ramprahar.com

सोमवार, ७ एप्रिल २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


## अंतरंग


महिलांचे कपडे चोरणाऱ्याला पोलिसांनी ठोकल्या बेड्या/२

माथेरान विकासाच्या मुद्द्यावर सर्वपक्षीयांची एकजूट/५

जसप्रीत बुमराह मुंबई इंडियन्स संघात दाखल/८


# भाजप कार्यकर्त्यांचा पक्ष –मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**नागपूर : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्ष आज ४५ वर्षांचा झाला असून पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात २०१४मध्ये आपल्याला पहिल्यांदा स्वबळावर जनतेने निवडून दिले. सध्या देशातील १६ राज्यांमध्ये भाजप स्वबळावर सत्तेत असून २१ राज्यांत मित्रपक्षांसोबत सरकारमध्ये आहे. असे असतानाही भाजपने लोकशाही सोडली नाही. हा पक्ष कायम कार्यकर्त्यांचा राहिला. त्यामुळेच एक चहा विकणारा देशाचा पंतप्रधान होऊ शकतो, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी (दि. ६) नागपूर येथे केले. भाजप स्थापना दिनानिमित्त आयोजित ऑनलाईन कार्यकर्ता संमेलनात ते बोलत होते.

कार्यकर्त्यांना संबोधित करताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी भाजपच्या गौरवशाली इतिहासाला उजाळा दिला. ते म्हणाले, १९५२मध्ये जनसंघाच्या रूपाने आपला पक्ष जन्माला आला. राष्ट्र प्रथम ही आमची शिकवण आहे. आणीबाणीच्या काळात इंदिरा गांधींनी सर्वाधिक भाजप आणि संघाच्या लोकांना कारागृहात टाकले. देशाचे संविधान वाचवण्यासाठी कुठलाही अपराध नसताना आमचे लोक दोन वर्ष कारागृहात राहिले. त्यानंतर देशात जनता पक्षाचे सरकार आले. मोरारजी देसाई पंतप्रधान झाले, पण कम्युनिस्ट पक्ष आणि इतरांमुळे जनता पक्ष फुटला. श्रद्धेय अटलबिहारी वाजपेयींच्या नेतृत्वात भाजपची स्थापना होऊन आपले पहिल्यांदा सरकार आले. आज पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वात तिसऱ्यांदा आपण देशात सरकारमध्ये आहोत. भारताची यशस्वी घोडदौड जगातील अनेक देश आश्चर्यचकित करीत आहे.

आज देशातील अनेक राज्यात भाजपचे सरकार आहे, परंतु हा केवळ कार्यकर्त्यांचा पक्ष आहे आणि येथे लोकशाहीलाच महत्त्व आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

### भाजप विचाराधिष्ठित पक्ष : ना. नितीन गडकरी

**नागपूर** : भाजप हा विचाराधिष्ठित पक्ष आहे. असंख्य कार्यकर्त्यांचे बलिदान आणि समर्पणातून आज भाजप जगातील सर्वांत मोठा पक्ष ठरला आहे. सुशासन आणि जनतेचा विकास हेच आपले उद्दिष्ट आहे, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्गमंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केले. भाजप स्थापना दिनाचे औचित्य साधून गांधीसागर महाल येथे सुसज्ज अशा कार्यालयाचा भूमिपूजन सोहळा रविवारी (दि. ६) झाला. त्या वेळी ते मार्गदर्शन करीत होते. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## भाजप स्थापना दिन पनवेलमध्येही उत्साहात साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रथम राष्ट्र, नंतर संघटन आणि शेवटी स्वतः अशी देशहिताची विचारसरणी असलेल्या आणि त्यानुसार कार्यरत असलेल्या भारतीय जनता पक्षाचा ४६वा स्थापना दिन रविवारी (दि. ६) पनवेलमध्ये मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

१९८०मध्ये आजच्या दिवशी भारतीय जनता पक्षाची सुरुवात झाली होती. भाजपचे पूर्वीचे नाव जनसंघ होतो, जो १९७७मध्ये पक्षात विलीन झाला. केवळ तीन राज्यांपुरता मर्यादित असणारा पक्ष बघता बघता केवळ देशच नाही तर संपूर्ण जगभरातील मोठा पक्ष म्हणून ओळखला जात आहे.




(अधिक छायाचित्र पान ८ वर..)


पक्ष स्थापना दिनाच्या अनुषंगाने राज्याचे कार्यकुशल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ऑनलाईन मार्गदर्शन करून संबोधित केले. पनवेलचे लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांनी ग्रामीण भागातील तोंडरे येथे, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी खारघर कार्यालयात, पनवेल तालुका व शहर मध्यवर्ती कार्यालयात महापालिका माजी सभागृह नेते परेश ठाकूर व शहर अध्यक्ष अनिल भगत, तर तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे त्या त्या विभागातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ऑनलाईन संवादाचा लाभ घेतला.

आज भारतीय राजकारणात भाजप केंद्रस्थानी आहे. एकेकाळी ज्या भाजपला राजकीय परिघाबाहेर ठेवण्यासाठी विरोधकांनी आटापिटा केला, त्याच भाजपने सिद्ध केलेल्या विषयसूचीवर देश प्रगती करीत आहे. देशाचे सक्षम नेतृत्व पंतप्रधान नरेंद्र मोदी, महाराष्ट्राचे कार्यकुशल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपचे केंद्र व राज्यातील लोकप्रतिनिधी सर्वसामान्य जनतेसाठी दूरदृष्टीने काम करीत आहेत. त्यामुळेच भाजप आणि सर्वसामान्य माणूस यांचे नाते घट्ट झाले आहे.

भाजपच्या यशासाठी कार्यकर्त्यांच्या अनेक पिढ्यांचे मोलाचे योगदान आहे; तर पक्षानेही कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांना ताकद दिलेली आहे. **(पान २ वर..)**



**पनवेल : भारतीय जनता पक्षाच्या स्थापना दिनानिमित्त लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांनी त्यांच्या निवासस्थानी सहकुटूंब ध्वजारोहण केले.**

**उरण : दमदार आमदार महेश बालदी, पदाधिकारी व प्रमुख कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षाच्या स्थापना दिनानिमित्त पक्ष कार्यालय येथे एकत्र जमून ध्वज उंचावला.**



## निवडक

### भारतीय नौदलामुळे वाचला पाकिस्तानी मच्छिमाराचा जीव

**मस्कत** : अरबी समुद्रातील मध्य भागात तैनात असलेल्या भारतीय युद्धनौकेमुळे एका पाकिस्तानी मच्छिमाराचा जीव वाचल्याची घटना समोर आली आहे. ओमान या देशाच्या किनाऱ्याजवळ ही घटना घडली. विशेष म्हणजे या मच्छिमारावर भर समुद्रात बोटीतच शस्त्रक्रियादेखील करण्यात आल्याचे समोर आले आहे. त्यामुळे पाकिस्तानी मच्छीमार जीवावरच्या संकटातून बाहेर पडण्यास मदत झाली.

### ट्यूलिप गार्डनला १० दिवसांत तब्बल अडीच लाख पर्यटकांची भेट

**श्रीनगर** : निसर्गाने अतुलनीय सौंदर्य बहाल केलेल्या जम्मू–काश्मीरला पृथ्वीचा स्वर्ग अशी सार्वत्रिक मान्यता का आहे या प्रश्नाचे उत्तर दाल सरोवर आणि झाबरवान हिल्स यांच्यामध्ये वसलेले आशियातील सर्वात मोठे ट्यूलिप गार्डन देते. मागील महिन्यात हे गार्डन पर्यटकांसाठी खुले करण्यात आले आणि अवघ्या १० दिवसांमध्ये तब्बल २.५ लाख पर्यटकांनी या गार्डनला भेट देत नवा विक्रम प्रस्थापित केला आहे.

## देशातील पहिल्या व्हर्टिकल लिफ्ट सागरी पुलाचे पंतप्रधान मोदींच्या हस्ते उद्घाटन

**रामेश्वरम : वृत्तसंस्था**

तामिळनाडूतील रामेश्वरम येथे भारतातील पहिला व्हर्टिकल लिफ्ट सागरी पूल पांबनचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते रविवारी (दि. ६) करण्यात आले. यासोबतच त्यांनी राज्यात इतर अनेक विकास प्रकल्पही सुरू केले.

पंतप्रधानांनी नवीन पांबन रेल्वेपूल जनतेला समर्पित केला. या वेळी त्यांनी रामेश्वरम आणि तांबरम (चेन्नई)दरम्यान नवीन रेल्वेसेवेला हिरवा झेंडाही दाखवला.

व्हर्टिकल लिफ्ट ब्रिज म्हणजे असा पूल जो गरज पडल्यास पाण्याच्या पृष्ठभागाच्या वर उचलता येतो. उभ्या पुलाची उभारणी केल्याने मोठी जहाजे त्या ठिकाणाहून सहज जाऊ शकतील. हा पूल २.०८ किलोमीटर लांबीचा आहे आणि यासाठी सुमारे ५५० कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च आला आहे.



### पंतप्रधानांनी घेतले ‘राम सेतू’चे दर्शन

पंतप्रधान नरेंद्र मोदी थायलंड आणि श्रीलंका दौऱ्यावरून पुन्हा भारतात परतले आहेत. ते श्रीलंकेहून थेट तामिळनाडूतील रामेश्वरम येथे पोहचले होते. या वेळी त्यांनी विमानातून राम सेतूचे दर्शनही घेतले. या संदर्भात त्यांनी स्वतःमाहिती दिली तसेच एक व्हिडीओ सोशल मीडिया प्लेटफॉर्म ‘एक्स’वर पोस्ट केला आहे.



पंतप्रधान मोदी यांनी लिहिले आहे, नुकतेच श्रीलंकेतून परतताना मला राम सेतूच्या दर्शनाचे सौभाग्य लाभले. आणि एक दिव्य संयोग म्हणजे, ज्या दिवशी आयोध्येत ‘सूर्य तिलक’ होत होता, त्याच दिवशी हे घडले. या दोन्ही दर्शनाने मी धन्य झालो. प्रभू श्री राम हे आपल्या सर्वांना जोडणारी एक शक्ती आहे. त्यांच्या आशीर्वाद सदैव आपल्या सोबत राहो.

## वृक्ष कोसळून वाहतूक ठप्प; दोघे किरकोळ जखमी

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील रेवस ते अलिबाग मार्गावर रविवारी (दि. ६) दुपारी अडीच्या सुमारास भलामोठा वृक्ष कोसळला. यामुळे या मार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. या दुर्घटनेत दुचाकीवरून जाणारे दोघे किरकोळ जखमी झाले आहेत.

घटनेनंतर या मार्गावरील वाहतूक कनकेश्वरमार्गे वळवण्यात आली होती. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी या घटनेची तत्काळ दखल घेत झाडे तोडणारे कामगार आणि जेसीबीच्या सहाय्याने तासाभराच्या प्रयत्नानंतर हा वृक्ष बाजूला केला. त्यानंतर वाहतूक पूर्ववत सुरू झाली. यात थळ ग्रामपंचायतीने महत्त्वपूर्ण सहकार्य केले.

**(सविस्तर वृत्त पान २ वर..)**

## अविनाश तावडे यांचा खोपोली शेकाप चिटणीसपदाचा राजीनामा

**खोपोली : प्रतिनिधी**

शेतकरी कामगार पक्षाचे खोपोली शहर चिटणीस, निष्ठावंत कार्यकर्ते अविनाश तावडे यांनी शेकापला राम राम केला आहे. त्यांनी पक्ष व पदाचा राजीनामा दिला आहे.



रायगड जिल्ह्यात शेतकरी कामगार पक्षाला घरघर लागली असून विविध भागातील पदाधिकारी व मुख्य कार्यकर्ते अन्य पक्षांकडे वळले आहेत. जिल्ह्याचे वरिष्ठ नेते लक्ष देत नाही तसेच आपले म्हणणे ऐकून घेत नसल्याची कार्यकर्त्यांची तक्रार आहे.

गेल्या काही महिन्यांपासून शेकापचे वर्चस्व असलेल्या खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या अनेक पदाधिकाऱ्यांवर नागरिकांकडून गैरव्यवहाराचे आरोप होत आहेत. याबाबत दस्तूरखुद्द संस्थेचे एक संचालक यशवंत साबळे यांनी अलीकडे गैरव्यवराबाबत आरोप केल्यामुळे केटीएसपी मंडळ सध्या चर्चेत आहे. याबाबतही शेकाप कार्यकर्त्यांनी नाराजी व्यक्त केल्याचे बोलले जाते. त्याचे पडसाद अविनाश तावडे यांच्या राजीनामा देण्याने उमटले आहेत.

अविनाश तावडे यांनी पक्षाचा व पदाचा राजीनाम्याबाबत वैयक्तिक कारण असल्याचे पत्रात नमूद केले तरी पक्षाचे वरिष्ठ लक्ष देत नाही हेच प्रमुख कारण असल्याचे आतल्या गोटातून बोलले जात आहे. तावडे यांच्यानंतर आणखी काही जण राजीनामा देण्याच्या तयारीत असल्याचीही चर्चा आहे.

## राम नवमी भक्तीमय वातावरणात साजरी

**अलिबाग, पनवेल : प्रतिनिधी**

मर्यादापुरुषोत्तम प्रभू श्रीरामचंद्र यांचा जन्मदिवस अर्थात राम नवमी रविवारी (दि. ६) रायगड जिल्ह्यात उत्साही आणि भक्तीमय वातावरणात साजरी झाली. या निमित्ताने जिल्ह्यात ठिकठिकाणी विविध धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दिवसभर श्रीरामाचा जयजयकार सुरू होता.

राम मंदिरांमध्ये रविवारी सकाळपासूनच दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती. दुपारी १२च्या सुमारास श्रीराम जन्मोत्सव सोहळा झाला. या वेळी पुष्पवृष्टी करून टाळ मृदुंगाच्या गजरात रामनामाचा जयघोष करण्यात आला. फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. यानंतर महिलांनी आरती करून श्रीरामाचा पाळणा म्हटला. प्रसाद म्हणून सुंठवड्याचे वाटप करण्यात आले.

पनवेल तालुक्यातील शिवाजी नगर येथील श्री राधाकृष्ण मंदिरातही राम नवमी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या उत्सवाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देत मनोभावे दर्शन घेतले. या वेळी कृष्णाशेठ ठाकूर यांच्या हस्ते मंदिरामध्ये पूजा करण्यात आली.

या उत्सवावेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, माजी पं.स. सदस्य रत्नप्रभा घरत तसेच राधाताई ठाकूर जयवंत देशमुख, भार्गव ठाकूर, पी.के. ठाकूर, गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, सी.एल. ठाकूर, व्ही.के. ठाकूर, शशिकांत ठाकूर, जगदीश ठाकूर, सागर ठाकूर, धनाजी ठाकूर, टी. के. ठाकूर, अमोघ ठाकूर, आदित्य ठाकूर, अपूर्व ठाकूर यांच्यासह ग्रामस्थ आणि भाविक उपस्थित होते.





## अलिबागमध्ये आजपासून कबड्डीची धूम

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनतर्फे रायगड कबड्डी लीग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. अलिबाग समुद्र किनाऱ्यावरील मैदानावर ही स्पर्धा सोमवार (दि. ७)पासून खेळवली जाणार आहे. या स्पर्धेची तयारी पूर्ण झाली असून पर्यटननगरी अलिबाग सज्ज झाले आहे.

रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनतर्फे आयोजित कबड्डी लीग स्पर्धेचे हे पहिले पर्व आहे. स्पर्धेत आठ मालकांचे संघ सहभागी होणार आहेत. ओपी इगल्स, एम.डी. वॉरियर्स, पेण वॉरियर्स, ए.पी. सुपरप्लेअर्स, आवास वायपर्स, समिरा छावा, एस.बी. फायटर्स, व्ही.जी. टायगर्स अशी या संघांची नावे आहेत. यामध्ये जिल्ह्यातील अव्वल ९६ खेळाडू खेळ दाखवतील.

### रायगड कबड्डी लीगसाठी पर्यटननगरी सज्ज



चार दिवस चालणारी ही स्पर्धा मॅटवर खेळवली जाईल. सामने सुपर लीग पद्धतीने खेळविण्यात येणार आहेत. सुमारे पाच हजार प्रेक्षक बसू शकतील अशी गॅलरी उभारण्यात आली आहे. अलिबाग शहरात खेळाडूंच्या स्वागताच्या कमानी उभारण्यात आल्या आहेत.

स्पर्धेत खेळणाऱ्या आठ संघांवर प्रत्येकी सुमारे दोन लाख रुपये खर्च रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन करणार आहे. प्रत्येक खेळाडूस बूट व कबड्डीचा गणवेश असोसिएशनतर्फे देण्यात येणार आहे. विजेत्या संघांना रोख रक्कम व ट्रॉफी देऊन गौरविण्यात येईल. स्पर्धा यशस्वी करण्याकरिता विविध समित्या स्थापन करण्यात आल्या असून रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे पदाधिकारी, खेळाडू परिश्रम घेत आहेत.

> **स्पर्धेची पूर्वतयारी पूर्ण झाली आहे. कबड्डीची स्पर्धा वेळेत सुरू होत नाही. त्यामुळे सामने संपण्यास उशीर होतो. आम्ही या स्पर्धेच्या उद्घाटन समारंभात भाषणबाजी ठेवणार नाही. सामने वेळेत सुरू होतील.**
> **–ॲड. आस्वाद पाटील, अध्यक्ष, रायगड कबड्डी लीग**

# दरडग्रस्त पारमाची गावाचे होणार पुनर्वसन

## मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते भूमिपूजन

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील पारमाची या गावात १९९४ साली अतिवृष्टीमध्ये दरड कोसळून १३ ग्रामस्थांचा मृत्यू झाला होता. अनेक घरांची पडझड झाली होती. तात्कालीन सरकारने पारमाची गावाचे पुनर्वसन करण्याची घोषणा केली, मात्र पुनर्वसन काही होऊ शकले नव्हते, परंतु मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकारने याची दखल घेत या पारमाची गावाचे पुनर्वसन करण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला असून मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते या पुनर्वसनाच्या कामाचे नुकतेच भूमिपूजन करण्यात आले आहे

२८ जून १९९४ रोजी महाड तालुक्यातील पारामाची गावावरती दरड कोसळली आणि यामध्ये तेरा निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागला होता. आज या घटनेला जवळपास ३० वर्ष पूर्ण झाली आणि हे गाव धोकादायक म्हणून घोषित करण्यात आले. मात्र अद्याप या गावचा पुनर्वसन झालं नव्हते. मंत्री भरत गोगावले यांनी तेव्हापासून आतापर्यंत या घटनेचा पाठपुरावा केला आणि आज अखेर मुख्यमंत्र्यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने या गावाला पुनर्वसनासाठी १९ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे.



आज राज्याचे रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खार भूमी विकास मंत्री नामदार भरत गोगावले यांच्या हस्ते या परमाची गाव आणि पारमाची बौद्धवाडी यांच्या पुनर्वसनाच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले.

या वेळी वारकरी संप्रदायाचे हभप फणसे बाबा, माजी जिल्हा परिषद सदस्य सुषमा गोगावले, सीईटीपी चे चेअरमन अशोक तलाठी, शिवसेना दक्षिण रायगड समन्वयक विजय सावंत, उपजिल्हाप्रमुख सुरेश महाडिक, विधानसभा संपर्कप्रमुख राजेश देशमुख, शिवसेना महाड तालुकाप्रमुख रवींद्र उर्फ बंधू तरडे, माजी जिल्हा परिषद सदस्य मनोज काळीजकर, माझी पंचायत समिती सभापती सपना मालुसरे, वरंध विभाग संपर्कप्रमुख लक्ष्मण भोसले, विभाग प्रमुख गोपीनाथ सावंत इत्यादी पदाधिकारी कार्यकर्ते शासकीय अधिकारी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते

या वेळी मंत्री भरत गोगावले यांनी तीस वर्षांपूर्वी घडलेल्या या दुर्दैवी घटनेची आठवण करत, तेव्हापासूनच आपण या गावाला न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करत असून ग्रामस्थांनीदेखील पुनर्वसनासाठी पाठपुरावा करत प्रचंड मेहनत घेतली आहे. आपल्या युती शासनाने जरी १९ कोटी रुपये दिले असले तरी यातील पंधरा कोटी सोयी सुविधांसाठी मंजूर झाले आहेत तर अडीच कोटी रुपये हे घरे बांधण्यासाठी दिले आहेत

यामध्ये घर बांधून होणार नाहीत, मात्र आपण सी एस आर च्या मार्फत या ठिकाणच्या नागरिकांना लवकरात लवकर कशी घरी बांधून मिळतील या प्रयत्नात असल्याचे गोगावले यांनी स्पष्ट केले आहे. या वेळी बोलत असताना त्यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत, ज्यावेळी मी अपक्ष पंचायत समितीचा सदस्य असताना ही घटना घडली कोणताही विचार न करता त्या वेळी जेवढी मदत करता येईल ती आमच्या पद्धतीने केली, मात्र आम्ही कुठेही कमी पडलो नाही.

आजपर्यंत आम्ही या गावच्या पुनर्वसनासाठी प्रयत्न करत राहिलो आता या प्रयत्नांना यश आले आहे, त्याचा फायदा गावच्या नागरिकांनी एकमेकांचे पाय न ओढता करून घ्यावे असा सल्ला दिला आहे तर निवडणुकीमध्ये आम्हाला काही मत कमी पडली असली तरी आम्ही त्याचा विचार करत नाही उलट पक्षी आम्हाला चार मते कमी द्या, मात्र आपल्या गावचा विकास करून घ्या कारण आपल्या हाताच एक बोट कापल तर दुसऱ्या बोटाला कळ येते ती दुसऱ्याच्या हाताला जात नाही आमचं नात या गावशी असच आहे निवडणुकीमध्ये नाराज असलेल्या ग्रामस्थांना हा एक प्रकारचा सल्ला मंत्री भरत गोगावले यांनी दिला आहे. त्यामुळे तीस वर्षानंतर का होईना अखेर पारामाची गावाला पुनर्वसन मिळणार हे आता निश्चित झाला आहे आणि तीस वर्ष पावसाळ्यात जीव मुठीत धरून वावरणाऱ्या नागरिकांना दिलासा मिळणार आहे.

## अलिबाग-रेवस मार्गावर भलामोठा वृक्ष कोसळला

### वाहतूक तासभर ठप्प, दोघे किरकोळ जखमी

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील रेवस ते अलिबाग मार्गावर रविवारी दुपारच्या सुमारास भलामोठा वृक्ष कोसळला. यामुळे या मार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. या दुर्घटनेत दुचाकीवरून जाणारे दोघे किरकोळ जखमी झाले.

रविवारी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. रस्त्याच्या कडेला असलेले झाड मुळापासून उन्ळून रस्त्यावर पडले. आज रविवार सुटीचा दिवस असल्याने रस्त्यावर फारशी वर्दळ नव्हती त्यामुळे मोठी दुर्घटना टळली. तरीही दुचाकीवरून जाणारया दोघांना किरकोळ दुखापत झाली. या घटनेनंतर या मार्गावरील वाहतूक कनकेश्वर मार्गे वळवण्यात आली होती. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकारयांनी या घटनेची तत्काळ दखल घेतली. झाडे तोडणारे कामगार आणि जेसीबीच्या सहाय्याने तासाभराच्या प्रयत्नानंतर झाड बाजूला केले.

या मार्गावर अनेक जुनाट वृक्ष कोसळण्याच्या स्थितीत आहेत. यामुळे मोठा अपघात होण्याची भीती आहे. हे वृक्ष हटवण्याची मागणी प्रवाशांकडून होते आहे. महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाकडे वर्ग करण्यात आला आहे. या विभागाचे कार्यालय मुंबईत असल्याने या समस्येकडे कोण लक्ष देणार असा प्रश्न उपस्थित होत आहे.



# मुरूड तालुक्यातील आंबा, काजू पिकांवर रोगाचा प्रादुर्भाव; बदलत्या वातावरणामुळे बागायतदारांची चिंता वाढली

**मुरुड : प्रतिनिधी**

निसर्ग चक्र कधी बदलेल याचे अनुमान न लावता आल्यामुळे मुरुड तालुक्यातील आंबा व काजू बागायदार धास्तावला आहे . गेल्या सप्ताहात प्रचंड उकाडा वाढल्याने तापमानाचा पारा अचानक ३७ अंशापर्यंत वाढला त्यातून दि .३१ मार्च ते ४ एप्रिल पर्यंत पावसाळी वातावरण तयार झाले पाऊस पडला नसला तरी तालुक्यातील आंबा व काजू पिकाला मोठा फटका बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे .

मुरुड तालुक्यात एकूण आंबा लागवड क्षेत्र.१)आंबा- १५९० हेक्टर २) काजु-२५.६० हेक्टर चे आहे. बिगर मोसमात आंब्याला आलेली पालवी व मोहोरामुळे मध्यंतरी आंबा फळगळतीला सुरुवात झाली होती. आता सलग पाच ते सहा दिवसांपासून ढगाळ वातावरण निर्माण झाल्याने उर्वरित मोहोरावर भुरी, तुडतुड्या रोगांचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. जानेवारीच्या प्रारंभी आंब्याला मोहोर आल्यानंतर साधारणत :१०० ते ११० दिवसात फळ काढणी साठी तयार होते . त्याप्रमाणे आंबा उत्पादक काहीसा सुखावला होता .पण काही दिवसांपूर्वी आलेली बिगर हंगामी पालवी व मोहोर यामुळे फळगळतीला सुरुवात झाली. त्यात दोन-तीन दिवसांपासून ढगाळ वातावरणामुळे बागायतदार काळजीत पडला आहे.

काजु पिकाचे क्षेत्र तुलनेने कमी असले तरी डोंगरी भागात हे पीक चांगल्या प्रकारे येऊ घातले होते तथापि करपा रोगामुळे फलधारणेचे प्रमाण खुप कमी असल्याचे बागायतदारांचे म्हणणे आहे .गतवर्षी चे काजु पिक चांगल्या प्रकारे आल्याचे शेतकरी रत्नमाला बागुल यांनी सांगितले . यंदा ते घटल्याने प्रती झाडामागे दोन किलो ही उत्पादन येणार नाही असे सांगितले .

या संदर्भात मुरुड तालुका कृषी अधिकारी मनिषा भुजबळ यांना विचारले असता त्या म्हणाल्या की,सध्या सगळीकडे ढगाळ वातावरण असल्याने अवकाळी पावसाची शक्यता आहे. त्यामुळे आंबा पिकावर फुलकिडी व फळमाशी या किडींचा व करपा रोगाचा प्रादुर्भाव तर काजू पिकावर ढेकण्या व फुलकिडींचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे.त्यामुळे बागेची नियमितपणे पाहणी करून कीड व रोगनिहाय उपाययोजना करण्याचे आवाहन मुरुड तालुका कृषी अधिकारी मनिषा भुजबळ यांनी केले आहे.

***औषध फवारणी आवश्यक***

*आंब्यावरील फुलकिडींनी आर्थिक नुकसानीची पातळी (दहा फुलकिडी प्रति मोहोर किंवा फळांवर १ ते २५ टक्के पर्यंत भाग प्रादुर्भावित आढळल्यास) व्यवस्थापनाकरिता थायोमिथोक्झाम २५ टक्के दोन ग्रॅम किंवा स्पिनोसॅड ४५ टक्के २.५. मिली प्रति १०लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. फळ माशीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढू शकतो त्याकरिता विद्यापीठाने विकसित केलेले रक्षक सापळे प्रती हेक्टर ४ या प्रमाणात बागेमध्ये लावून फळमाशीचा प्रादुर्भाव नियंत्रित आणावा. तसेच करपा रोगासाठी कार्बेन्डॅझिम १२ टक्के, मॅन्कोझेब ६३% या संयुक्त बुरशीनाशकाची १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी.*



## महिलांचे कपडे चोरणाऱ्याला पोलिसांनी ठोकल्या बेड्या

**महाड : प्रतिनिधी**

महाड शहरातील पंचशील नगर-नवेनगर येथून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. रात्रीच्या वेळेस महिलांचे कपडे चोरणारा इसम सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद झाला आहे. नवे नगर येथील रहिवाशी प्रदीप अनंत सोंडकर यांनी संबंधित आरोपी विरोधात महाड शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

या प्रकरणी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार तक्रारदार व आरोपी हे एकाच ठिकाणी राहणारे असून एकमेकांचे शेजारी आहेत. रात्रीच्या वेळेस महिलांचे कपडे चोरीला जातात, तब्बल सहा महिने हा प्रकार सतत चालू होता. याचा पाठपुरावा करण्यासाठी तक्रारदार यांनी सीसीटीव्ही बसवला आणि या सीसीटीव्ही फुटेजमध्ये महिलांचे कपडे चोरणारा कैद झाला.

निलेश इल्या बाळा एनकर असे कपडे चोरणाऱ्या आरोपीचे नाव असून महाड शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता ३०५ (ब) कलमाप्रमाणे अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधित आरोपीवर गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करून कडक कारवाई व्हावी, अशी मागणी येथील रहिवाशांनी केली आहे.

## भाजपचा स्थापना दिवस उत्साहात; आमदार मंदा म्हात्रेंच्या नेतृत्वाखाली पदाधिकाऱ्यांची उपस्थिती

**नवी मुंबई : बातमीदार**

भारतीय जनता पक्षाचा ४६वा स्थापना दिवस आमदार मंदा म्हात्रे यांच्या नेतृत्वात रविवारी सीबीडी येथील वारकरी भवननात` भारतीय जनता पार्टीच्या हजारो कार्यकर्त्यांसमवेत जल्लोषात साजरा करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री .देवेंद्र फडणवीस यांनी ऑनलाईनद्वारे भाजपाच्या स्थापना दिनाच्या कार्यकर्त्यांना शुभेच्छा देत प्रभू श्री राम नवमीच्या देखील खूप खूप शुभेच्छा दिल्या.



हा देखील एक विलक्षण योगा योग आहे की प्रभू श्री रामाचे मंदिर, अयोध्येमध्ये तयार होऊन श्री राम लला विघ्न रूपाने त्या ठिकाणी स्थापित झाल्या नंतर यावर्षी श्री राम नवमी व भारतीय जनता पक्षाचा स्थापना दिवस हा एकाच दिवशी आला हा विलक्षण नसून तर ईश्वरी संकेत आहेत. असे उदगार महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.

०६ एप्रिल १९८० ला भाजपाची स्थापना झालेली होती. सुरुवातीला जनसंघ म्हणून ओळख असलेला पक्ष नंतर भारतीय जनता पक्ष नावानं उदयाला आला आहे. तसेच पक्ष स्थापना दिनानिमित्त भाजपाच्या प्रत्येक कार्यकर्त्याने संघटन पर्वात घेतलेल्या परिश्रमाचा जो अविष्कार आपण ध्येयपूर्ती १.५ कोटी सभासद करून दाखविलेला आहे त्याचा हि जल्लोष, आनंद उत्साहात साजरा केला गेला.

तसेच आज भाजपा स्थापना दिना निमित्त आमदार म्हात्रे माजी जिल्हाध्यक्ष सी.व्ही. रेड्डी, माजी नगरसेवक दीपक पवार, माजी नगरसेवक निलेश म्हात्रे, माजी नगरसेवक राजू शिंदे, माजी नगरसेविका अनिता शेट्टी, कुणाल महाडिक, तसेच असंख्य आजी माजी पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## समर्थ चषक ग्रुपकडून मासळी विक्रेत्या महिलेस इलेक्ट्रिक वजन काटा भेट



**उरण : वार्ताहर**

समर्थ चषक ग्रुपच्या माध्यमातून पिरकोन येथे राहणारी वंदना परमानंद गावंड या मच्छी विक्रेती महिलेस रविवार इलेट्रिक वजन काटा भेट देण्यात आला वंदना गावंड यांनी सर्वांचे आभार मानले .

समर्थ चषक क्रिकेट क्रिकेट स्पर्धेतर्फे पिरकोन आणि सारडे येथील शाळांना मदत करण्यात आली. याच्यापुढे ही समर्थ चषक ग्रुपतर्फे गोरगरीब गरजूना आणि शाळांना मदत करण्यात येईल असे सुतोवाच समर्थ चषक आयोजक मुकुंद गावंड आणि अमित पाटील व सर्व आयोजकांनी सांगितले

गोरगरीब निराधार महिलांना मदतीचा नेहमीच हात देणार गरीबांची सेवा हीच खरी ईश्वर सेवा असे मी समजतो, असे भाजप उरण तालुका उपाध्यक्ष यांनी मनोगतात सांगितले.

पान १ वरुन

## भाजप कार्यकर्त्यांचा पक्ष -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

सध्या संघटनपर्वाच्या माध्यमातून पक्ष अधिक मजबूत होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मार्गदर्शन, राष्ट्रीय सहसंघटनमंत्री शिवप्रकाश, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि लोकप्रतिनिधींच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात तब्बल एक कोटी ५१ लाख सदस्यांची नोंदणी झाली आहे. संघटन मजबुतीकरण व विस्ताराचा हा मोठा पल्ला पक्षश्रेष्ठी, पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या भरवशावर, त्यांच्या सहकार्याने आणि त्यांच्या आधाराने पूर्णत्वास गेला.

भाजप हा जगातील सर्वात मोठा व क्रमांक एकचा पक्ष ठरला आहे. ६ एप्रिल पक्षाचा स्थापना दिवस देशभरात, राज्यात मोठ्या उत्साहात साजरा होत असताना माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर व जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल, नवीन पनवेल, कामोठे, कळंबोली, खांदा कॉलनी, खारघर तसेच पनवेल तालुक्यात विविध ठिकाणी हा दिवस उत्साहपूर्ण वातावरणात साजरा झाला. या वेळी जनसंपर्क कार्यालयाला विद्युत रोषणाई करण्यात आली होती. दुपारच्या सत्रात राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे ऑनलाईन मार्गर्शनही प्रत्येक जनसंपर्क कार्यालयात आयोजित करण्यात आले होते. त्याचा लाभ पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या स्वरूपात घेतला. यावेळी भारतमाता की जय, वंदे मातरम अशा गगनभेदी घोषणा देत उपस्थितांनी आनंद व्यक्त केला.

यानिमित्ताने आमदार प्रशांत ठाकूर यांनीही कार्यकर्त्यांशी संवाद साधला. या वेळी कार्यक्रमाचे वातावरण देशभक्तीने भारलेले होते आणि उपस्थितांनीही एकत्र येऊन राष्ट्रप्रेमाची भावना व्यक्त केली.

## पेब किल्ल्यावर अडकलेल्या सात ट्रेकरची सुखरूप सुटका

**नेरळ : प्रतिनिधी**

माथेरानच्या विकट गडावर (पेब किल्ला) अडकून पडलेल्या सात पर्यटकांची नेरळ पोलीस आणि आपत्कालीन सामाजिक संस्थांनी नऊ तासांनी सुखरूप सुटका केली आहे. हे पर्यटक ट्रेकिंगसाठी या किल्ल्यावर आले होते. त्यांच्यापैकी एका तरुणीला उन्हाचा त्रास होऊ लागल्याने त्यांनी हेल्पलाईन क्रमांकावर कॉल केला. त्यानंतर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत कार्यवाही केली.

काही अंतर चालल्यानंतर तरुण पायवाट रस्ता हरवून बसल्याने या तरुणांना काही स्थानिकांनी आपण रस्ता चुकले म्हणून मार्गदर्शनही केले होते. त्यानंतरही हे तरुण वाट चुकल्याने यामधील एका तरुणीस उन्हाचा त्रास झाला व भोवळ आल्याने ती जागेवरच बसली. बॅगेत सोबत आणलेले पाणी, अन्न संपल्याने जंगलात कुठे पाणी मिळत नसल्याने त्यानंतर तरुणांनी ११२ या हेल्पलाइन क्रमांकावर मदत मागितली होती. त्यानुसार नेरळ पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी शिवाजी ढवळे यांनी सह्याद्री आपत्कालीन सामाजिक संस्था माथेरान आणि स्थानिक ममदापूरवाडी येथील तरुणांना अडकलेल्या तरुणांच्या मदतीसाठी पाठवले. त्यांनी तब्बल नऊ तासानंतर या तरुणांची सुखरूप सुटका केली.

# अतिक्रमित पदपथ पनवेल पालिकेकडून मोकळे

**पनवेल : वार्ताहर**

खारघर शहरातील पदपथ अडवून व्यवसाय करणाऱ्या दुकानदार आणि अनधिकृत फेरीवाल्यांवर पनवेल महापालिकेने धडक कारवाई करून मार्जिनल आणि पदपथ मोकळे केले आहेत. त्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

खारघरमध्ये दुकानांसमोरील मार्जिनल स्पेस, तसेच पदपथावर अतिक्रमण करण्यात आल्याने पादचाऱ्यांना कोंडीचा त्रास सहन करावा लागत होता. याची दखल घेत खारघर प्रभाग अधिकारी जितेंद्र मढवी यांच्या आदेशानुसार अतिक्रमण पथकाने खारघर परिसरात मार्जिनल स्पेस आणि पदपथावर अतिक्रमण करून विक्रीसाठी ठेवण्यात आलेले साहित्य जप्त करून कारवाई केल्यामुळे दुकानदारांचे धाबे दणाणले आहेत.

खारघर परिसरातील सेक्टर १५, १८, १९, तसेच इतरही सेक्टरमधील बहुतांश भागातील दुकानदारांनी विक्रीसाठी आणलेले साहित्य नागरिकांच्या निदर्शनास यावे म्हणून मार्जिनल स्पेस व पदपथांवर कब्जा केला होता.

पालिकेकडून त्यांच्या साहित्यावर कारवाई केली जात असल्याची माहिती समाजमाध्यमांवर प्रसारित होताच खारघरमधील दुकानदार, व्यावसायिकांनी विक्रीसाठी ठेवलेले साहित्य उचलून पदपथ मोकळे केले.



**पनवेल : डॉ. अनिता तारळेकर सामाजिक संस्थेच्या वतीने खारघर येथे आयोजित केलेल्या आरोग्य कार्यशाळेला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट दिली. या कार्यशाळेने सहभागींना आरोग्याच्या महत्त्वपूर्ण मुद्द्यांवर प्रकाश टाकला आणि निरोगी जीवनशैलीसाठी मार्गदर्शन केले. या वेळी भाजप जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, अमर उपाध्यक्ष, दीपक शिंदे, संजय महाडिक आदी उपस्थित होते.**



**खारघर : इंटरिअर डिझायनर धर्मी पटेल यांनी सेक्टर १५मध्ये सुरू केलेल्या इनिसियो फर्निचर्सच्या भव्य आणि दिव्य फर्निचर्स शॉपच्या उद्घाटनावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती लाभली. त्यांनी यशस्वी व्यवसायासाठी पटेल यांना शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल व अन्य उपस्थित होते.**





**कळंबोली : राम नवमीनिमित्ताने कळंबोलीमधील मंदिरात आमदार प्रशांत ठाकूर यांनी सपत्नीक जाऊन अभिषेक करून पूजा केली व आरती करून श्री रामाचे दर्शन घेतले. या वेळी भाजप कळंबोली मंडल अध्यक्ष रविनाथ पाटील आणि अशोक मोटे यांच्यासह रामभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

# उरण येथे राम जन्मोत्सव साजरा

**उरण : वार्ताहर**

सालाबादप्रमाणे यंदाही राम नवमीनिमित्त रविवारी (दि.६) उरण बाजारपेठेमधील श्री राम मंदिरात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, असे मंदिराचे ट्रस्टी चंद्रकांत ठक्कर यांनी सांगितले.





सकाळी ६ वाजता काकड आरती, ७.१५ वाजता आरती, सकाळी ११ ते १ वाजेपर्यंत कीतर्नकार ह.भ.प.सुधीर बाळ (डोंबिवली) यांचे कीर्तन झाले. सर्वांनी सुश्राव्य किर्तनाचा लाभ घेतला. श्री राम जीवनाविषयी, मानवाने कसे वागले पाहिजे. आपला जन्म कशासाठी झाला आहे. आपण जीवनात रामाचे गुण उतरविले पाहिजेत देवांची भक्ती केली. आपले विचार, आचार, वागणूक चांगली ठेवली पाहिजे तर जीवनच सोन झाल्याशिवाय राहणर नाही, असे विचार कीर्तनामध्ये सांगितले गेले. दुपारी १२.४० वाजता श्रीराम जन्म, १२.५०वाजता नहाणी, दुपारी १ वाजता पाळणा घेण्यात आला, दुपारी १.१० वाजता आरती सर्व भाविकांना सुंठवडा व प्रसाद देण्यांत सर्वांनी दर्शनाचा, तीर्थ प्रसादाचा लाभ घेतला.

सायंकाळी ५ ते ६ वाजेपर्यंत भजने, श्री गुजराती महिला सत्संग मंडळाचे भजन झाले. श्री गजाजन प्रासादिक भजन मंडळ यांची पालखीसोबत भजने झाली.

या कार्यक्रमास उरण विधानसभा आमदार महेश बालदी, चंद्रकांत ठक्कर, कौशिक शहा, निलेश ठक्कर, वसंत ठक्कर, सदानंद गायकवाड, विक्रम ठक्कर यांच्यासह सर्व सदस्य, हितचिंतक, ग्रामस्थ आदींचे सहकार्य मिळाले, असे आयोजकांनी सांगितले.

# कळंबोलीत भाजपचा वर्धापन दिन

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

भाजपच्या कळंबोली मध्यवर्ती कार्यालयामध्ये पक्षाचा वर्धापन दिन कार्यकर्ते व पदाधिकारी यांच्यासह उत्साहाने साजरा करण्यात आला कार्यकर्त्यांना लाडू वाटून कार्यक्रम साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमात भाजप भटके विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष बबन बारगजे यांनी भारतीय जनता पक्षाच्या स्थापनेपासूनचा इतिहास कार्यकर्त्यांसमोर मांडला. त्याचप्रमाणे जुन्या आठवणींना उजाळा दिला तसेच कळंबोली शहराध्यक्ष रविनाथ पाटील यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली पक्षाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी कार्यकर्त्यांसमोर मांडली.



माजी नगरसेवक बबन मुकादम यांनी सांगितले की, मी जरी २०२१ला पक्षात आलो असलो तरी मनाने मी २०१२पासूनच भाजपासोबत जोडलेलो होतो. या वेळी सूत्रसंचालन दिलीप बिष्ट यांनी केले. या कार्यक्रमास माजी नगरसेवक सर्वश्री अमर पाटील राजेंद्र शर्मा, भाजप उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्षा प्रिया मुकादम, उत्तर रायगड जिल्हा चिटणीस संदीप म्हात्रे, आभा घुटूकडे, सुनील ढेम्बरे, केशव यादव सह अनेक शक्ती केंद्रप्रमुख बुथ अध्यक्ष व कार्यकर्ते उपस्थित होते.




























**पनवेल : राम नवमीनिमित्त आमदार प्रशांत ठाकूर यांनी तालुक्यातील कोयनावेळे, घोट कॅम्प, कानपोली, तोंडरे, ढोंगऱ्याचा पाडा, नेवाळी, भंगारपाडा आदी ठिकाणी आयोजित कार्यक्रमांना भेट दिली व दर्शन घेतले. या वेळी भाजपचे स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

संपादकीय

## भाजपची दमदार वाटचाल


प्रथम राष्ट्र, नंतर पक्ष, शेवटी स्वतः या ब्रीदवाक्यानुसार चालणाऱ्या भारतीय जनता पक्षाचा ४६वा स्थापना दिन रविवारी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विशेष म्हणजे या दिवशी रामनवमी आल्याने दुग्धशर्करा योग जुळून आला. भाजप आज अग्रस्थानी असला तरी इथपर्यंतचा प्रवास काही सोपा नव्हता...

**अंधेरा छटेगा, सूरज निकलेगा, कमल खिलेगा असे म्हणत ज्येष्ठ नेते अटलबिहारी वाजपेयी यांनी ६ एप्रिल १९८० रोजी मुंबई येथे देशसेवेसाठी भाजपरूपी बीज रूजवले. आज या पक्षाचा वटवृक्ष झाला आहे. खरंतर भाजपची निर्मिती जनसंघातून झाली. पुढे मजल दरमजल करीत गेल्या चार दशकांहून अधिक काळापासून हा पक्ष भारतीय राजकारणात सक्रिय आहे. या काळात भाजपने लोकसभेत अवघ्या दोन जागांवरून ३०३ जागांपर्यंतचा मोठा पल्ला गाठला. सन १९८०पासून भाजपची ताकद वाढू लागली. रामजन्मभूमी आंदोलनातून भाजपला मोठी ओळख मिळाली. माजी पंतप्रधान स्व. अटलबिहारी वाजपेयी, ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी ते विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री व पक्षाचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष अमित शाहा या जोडीपर्यंत पक्षाने नवीन उंची गाठली. सर्वप्रथम १९९६ साली भाजप लोकसभेतील सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आला. अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान झाले, परंतु स्पष्ट बहुमत नसल्याने त्यांचे सरकार केवळ १३ दिवस टिकले. त्यामुळे १९९८मध्ये झालेल्या मध्यावधी निवडणुकीनंतर भाजपने इतर मित्रपक्षांसह राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) स्थापन केली आणि सत्ता हस्तगत केली, मात्र १९९९मध्ये पुन्हा सरकार कोसळले. त्यानंतर झालेल्या निवडणुकीत भाजपसह एनडीएने बाजी मारली आणि वाजपेयींनी साडेचार वर्षे देशाचे पंतप्रधान म्हणून कारभार पाहिला. पुढे २००४च्या लोकसभा निवडणुकीत एनडीएचा पराभव झाला. काँग्रेसप्रणित संयुक्त पुरोगामी आघाडीने (यूपीए) दहा वर्ष देशावर राज्य केले. २०१४मध्ये गुजरातचे मुख्यमंत्री राहिलेले नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली पहिल्यांदाच देशात भाजपचे पूर्ण बहुमताचे सरकार स्थापन झाले. पहिल्या पाच वर्षांतच मोदी सरकारने आपल्या कामाची चुणूक दाखवली. एकीकडे विकासाचा बॅकलॉग भरून काढताना दुसरीकडे शत्रू राष्ट्रांना धडा शिकवण्यासाठी वेळोवेळी ठोस पावले उचलली गेली. या यशानंतर २०१९च्या निवडणुकीत भाजपने आणखी एक पाऊल पुढे टाकत ऐतिहासिक यश प्राप्त केले. सबका साथ, सबका विकास या घोषणेसह सर्वांना सोबत घेत नवभारताच्या निर्मितीसाठी पंतप्रधान मोदी व सहकारी कार्यरत आहेत. त्यामुळेच २०२४मध्ये पुन्हा एकदा देशाच्या नेतृत्वाची सूत्रे नागरिकांनी भाजपप्रणित एनडीएकडे दिली. भाजप आज जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष बनला आहे. त्यामुळे या पक्षावर जबाबदारीही मोठी आहे. ते ध्यानात घेऊन पक्ष देशाला आत्मनिर्भर, बलशाली आणि समृद्ध बनविण्याच्या दृष्टीने वाटचाल करीत आहे. एका बाजूला पक्षीय पातळीवर विविध उपक्रम राबविण्यात येत असताना दुसरीकडे केंद्र व राज्य सरकारांच्या माध्यमातून विविध घटकांसाठी कल्याणकारी योजना आणण्यात आल्यात. विशेषत: शेतकरी, महिला, युवावर्गाला सक्षम करण्यावर भर दिला जात आहे. गोरगरीब, तळागाळातील लोकांना मुख्य प्रवाहात आणून देश २०४७पर्यंत महासत्ता बनविण्याचे ध्येय भाजपने ठेवले आहे. इतर पक्षांपेक्षा वेगळी कार्यशैली असलेल्या भाजपला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा!**

# दररोज मोठ्या प्रमाणात मंद विषाचे सेवन

आजच्या आधुनिक युगात माणसाने जशी प्रगती केली आहे, त्याच प्रमाणात, आरोग्याशीही तडजोड झाली आणि ती काळानुसार सतत वाढत आहे, ज्याचे कारण मानव स्वतः आहे. हृदयरोग, मेंदूचा झटका, कर्करोग यासारखे प्राणघातक आजार झपाट्याने वाढत आहेत, त्यासोबतच मधुमेह, रक्तदाब, लठ्ठपणा, अशक्तपणा, आहारात पोषक तत्वांचा अभाव या समस्या शिगेला पोहोचल्या आहेत, त्यामुळे अकाली मृत्यूची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. काही क्षणांपूर्वी पूर्णपणे निरोगी दिसणारी व्यक्ती, प्रौढांपासून ते लहान मुलांपर्यंत, खेळताना किंवा व्यायाम करताना किंवा बसल्याबसून देखील बेशुद्ध पडतात आणि अनेकदा त्यांचा मृत्यू झाल्याचे कळते. दशकापूर्वी आपण ज्या प्राणघातक आजारांबद्दल क्वचितच ऐकायचो, ते आता आपल्या नातेवाईक, शेजारी आणि कुटुंबातील सदस्यांपर्यंत पोहोचले आहे. मानवाचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य अत्यंत कमकुवत झाले आहे; हवामान बदलताच, लोक पटकन आजारी होतात. आपल्या देशातील सरासरी वयाचा दर पाश्चात्य देशांच्या तुलनेत सतत कमी होत आहे. २०२४ च्या जागतिक आनंद अहवालात भारत १४३ देशांपैकी १२६ व्या क्रमांकावर आहे. आनंदाच्या बाबतीत भारत पाकिस्तान, लिबिया, इराक, पॅलेस्टाईन आणि नायजर सारख्या देशांपेक्षाही मागे आहे. आजार वेगाने का वाढत आहेत या समस्येबद्दल तुम्ही कधी गांभीर्याने विचार केला आहे का? काय कारण असू शकते? निरोगी जीवन जगण्यासाठी आपल्याला दररोज पुरेशा प्रमाणात शुद्ध ऑक्सिजन, स्वच्छ पाणी आणि पौष्टिक अन्न मिळत आहे का?

प्रदूषण आणि अस्वच्छता आपला श्वास रोखत आहेत. २०२४ च्या एअर क्वालिटी इंडेक्सच्या आकडेवारीनुसार, भारत जगातील पाच सर्वात प्रदूषित देशांमध्ये समाविष्ट आहे. भारतातील सुमारे ७० टक्के पाणी प्रदूषित आहे आणि देशातील जवळजवळ अर्ध्या नद्या पिण्यासाठी किंवा सिंचनासाठी असुरक्षित आहेत, यामुळे, २०२४ च्या जागतिक जल गुणवत्ता निर्देशांकात भारत १२२ देशांपैकी १२० व्या क्रमांकावर आहे. २०२३ मध्ये बीएमजेमध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासात असे आढळून आले की भारतात दरवर्षी २.१८ दशलक्ष मृत्यू बाहेरील वायू प्रदूषणामुळे होतात. लॅन्सेट २०१९ मध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासात असे आढळून आले आहे की भारतात ५,००,००० हून अधिक मृत्यू जल प्रदूषणामुळे झाले आहेत. देशात हजारो कोटी रुपयांच्या बनावट औषधांचा



मोठा व्यवसाय आहे, मोठ्या सरकारी रुग्णालयांमध्येही रुग्णांना बनावट औषधे वाटली जातात. आशियातील सर्वात मोठ्या रुग्णालयांमध्ये समाविष्ट असलेल्या महाराष्ट्र राज्यातील नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात ही घटना नुकतीच उघडकीस आली.

धान्य पिकवण्यापासून ते आपल्या ताटात वाढण्यापर्यंत, त्यांना अनेक हानिकारक रासायनिक प्रक्रियांमधून जावे लागते. देशात अशुद्ध अन्न आणि अस्वच्छतेची समस्या खूप मोठी आहे. लोक स्वार्थ आणि लोभात इतके आंधळे झाले आहेत की ते एका रुपयाच्या फायद्यासाठी देखील इतरांना विष पाजण्यास तयार आहेत. अलिकडेच कोल्हापूरमधून बातमी आली की मृतदेहांवर वापरला जाणारा बर्फ बाजारात मिळणाऱ्या थंड पेयांमध्ये वापरला जात आहे. आपल्या देशात जेवळे दूध उत्पन्न होत नाही त्यापेक्षा जास्त दूध विकल्या जाते. देशातील ६८.७ टक्के दूध आणि दुग्धजन्य पदार्थांमध्ये प्रदूषक आढळून आले आहेत. तेल, तूप, गोड, नमकीन आणि मैदा सारख्या अन्नपदार्थांची मोठी मागणी आहे, जेव्हाकी ह्या पदार्थांचा आरोग्यावर खूप वाईट परिणाम होतो. मध, मसाले, चहापत्ती, तेल, दूध, मिठाई, तूप आणि केशर सारख्या अन्नपदार्थांमध्ये मोठ्या प्रमाणात भेसळ आहे. बाहेरील खाद्यपदार्थांचे रंग खूपच चटक आणि आकर्षक दिसतात. बहुतेक खाद्यपदार्थांना रंग देण्यासाठी नैसर्गिक रंगांऐवजी हानिकारक कृत्रिम रंगांचा वापर केला जातो. अन्नपदार्थांमध्ये वापरले जाणारे बाह्य बर्फ, पाणी, चटण्या, सॉसेज, खाद्यतेल हे बहुदा कमाल दर्जाच्या मानकांची पूर्तता करत नाहीत. देशातील बहुतेक स्ट्रीट फूड विक्रेत्यांना ग्लब्स न घालता थेट अन्नपदार्थांना स्पर्श करण्याची खूप वाईट सवय आहे. याचे गंभीर परिणाम ग्राहकांच्या आरोग्याला भोगावे लागत आहे. जे अन्न प्राण्यांसाठीही योग्य नाही, म्हणजेच प्राणघातक कचरा, ते मानव मोठ्या आवडीने

### जागतिक आरोग्य दिन विशेष

खात आहे.

देशातील बहुतेक अन्नपदार्थ पॅकिंग आणि गुंडाळण्यासाठी वर्तमानपत्रांचा वापर केला जातो, जो आरोग्यासाठी धोकादायक आहे. एफएसएसएआयच्या मते, अन्न पॅकेजिंग साहित्य म्हणून शोषक कागदाऐवजी वर्तमानपत्रांचा मोठ्या प्रमाणात वापर होत असल्याने भारतीयांमध्ये अन्न विषाक्तता हळूहळू पसरत आहे. रिफाइंड केलेले पीठ अर्थात मैदा रासायनिकरित्या ब्लीच केलेले (घातक) असते, त्याचा ग्लायसेमिक इंडेक्स जास्त असतो ज्यामुळे टाइप २ मधुमेह होऊ शकतो आणि फायबरच्या कमतरतेमुळे ते पचनसंस्थेसाठी अडथळा ठरते. जंक फूड तयार करण्यासाठी खाद्यतेलाचा मोठ्या प्रमाणात पुनर्वापर केला जातो; तेल वारंवार गरम केल्याने लिपिड्सचे ऑक्सिडेटिव्ह ब्रेकडाउन होते. पुन्हा गरम केलेल्या तेलाने बनवलेले अन्न दीर्घकाळ सेवन केल्यास व्यक्तीच्या अँटिऑक्सिडंट संरक्षण नेटवर्कवर गंभीर परिणाम होऊ शकतो, यामुळे उच्च रक्तदाब, मधुमेह आणि रक्तवाहिन्यांच्या जळजळासारखे विकार होऊ शकतात, नंतर पुढे घातक आजार होतात. जंक फूड किंवा बाहेरील अन्नामुळे उच्च कोलेस्ट्रॉल, हृदयरोग, मधुमेह, मूत्रपिंडाचे नुकसान, लठ्ठपणा, यकृताचे आजार, कर्करोग, दातांचे नुकसान, नैराश्य, पोटाचे विकार, त्वचारोग इत्यादी समस्यांचा धोका वाढतो. पॅकबंद अन्न आणि पेयांमुळे बहुदा आपण मायक्रोप्लास्टिकचे सेवन करत आहोत. भारतातील ५६ टक्के आजार हे अस्वास्थ्यकर आहाराशी संबंधित आहेत. आयुर्वेद म्हणतो की जर आहार योग्य नसेल तर आरोग्य सुधारण्यासाठी औषधही काम करणार नाही.

स्ट्रीट फूडचे आचारी किंवा अन्न विक्रेत्यांनी सरकारी सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. हात चांगले धुवा, स्वच्छ भांडी आणि उपकरणे वापरा, दुकानात स्वच्छता ठेवा, कच्चे आणि शिजवलेले अन्न वेगवेगळे ठेवा, अन्न तयार करण्यासाठी पिण्याचे पाणी वापरा. अन्न तयार करताना आणि वाढताना स्वच्छ धुतलेले कपडे घाला, ग्लब्स आणि एप्रन घाला. काम करताना तोंड आणि केस झाकून ठेवा, तसेच चेहरा, डोके, केस किंवा शरीराच्या इतर भागांना स्पर्श करणे किंवा खाजवणे टाळा. नखे कापा व स्वच्छता ठेवा. सुरक्षित तापमानात अन्न साठवा, चांगल्या दर्जाचा कच्चा माल निवडा, स्थानिक सरकारी नियमांनुसार कचऱ्याची योग्य प्रकारे विल्हेवाट लावा. तळण्यासाठी त्याच तेलाचा पुनर्वापर करू नका, अन्नपदार्थ झाकून ठेवा, शिळे अन्नपदार्थ विकू नका. हे नियम काटेकोरपणे पाळले पाहिजेत. स्वच्छतेसाठी आणि गुणवत्तेसाठी थोडे जास्त पैसे खर्च करावे लागले तरी ठीक, पण आरोग्याशी तडजोड करू नका.

आपल्या सभोवतालचे वातावरण आणि आपली जीवनशैली आपल्याला अकाली मृत्यूकडे वेगाने घेऊन जात आहे. देशातील अनेक व्हायरल फूड व्हिडिओ आणि बातम्यांमध्ये अन्नपदार्थांमधील अशुद्धता, निकृष्ट दर्जाचे अन्नपदार्थ, धोकादायक रासायनिक प्रक्रिया, विषारी रंग आणि भेसळ याबद्दल माहिती मिळतेच. देशात मोठ्या प्रमाणात भेसळीबरोबरच बनावट कंपन्यांचे अन्न आणि पेयेही विकली जातात. आपले आरोग्याची काळजी घेणे ही आपली स्वतः ची जबाबदारी आहे; घरी बनवलेल्या अन्नाला प्राधान्य द्या, दररोज व्यायाम, पुरेशी झोप, स्वच्छता आणि पौष्टिक आहाराची काळजी घ्या. गरम पेये आणि अन्नासाठी प्लास्टिक आणि छापील टाकाऊ कागद वापरू नयेत. शिळे अन्न, तळलेले, मसालेदार, गोड, मैदा असलेले, कृत्रिम रंग, पॅक केलेले अन्न आणि रासायनिक प्रक्रिया केलेले अन्नपदार्थांपासून दूर रहा. गरज पडल्यास, प्रवास करताना किंवा बाहेर जाताना घरून पिण्याचे पाणी आणि जेवणाचा डबा सोबत ठेवा. आरोग्य हीच खरी संपत्ती आहे, आरोग्याची काळजी घ्या, निरोगी आयुष्य जगा.

**-डॉ. प्रीतम गेडाम**



## बदलते तंत्रज्ञान



### १३ ते १७ वर्षे वयोगटातील मुलांसाठी खास उबर

ओला-उबर बुक करायची असेल तर घरातील मोठी मंडळीच सहसा कॅब बुक करतात. पण,




आता उबरने भारतात त्यांची उबर फॉर टीन्स ही सेवा देखील सुरू केली आहे.तर या सेवेमुळे १३ ते १७ वर्षे वयोगटातील किशोरवयीन मुले त्यांच्या पालकांच्या देखरेखीखाली राईड्स बुक करू शकतील. या फीचरचा उपयोग उद्देश किशोरवयीन मुलांना सुरक्षित प्रवास प्रदान करणे असा असणार आहे आणि पालकांना रिअल-टाइम ट्रॅकिंगआणि अलर्ट सुद्धा दिले जाणार आहे.अमेरिका आणि युरोपच्या काही भागात लाँच केल्यानंतर, उबर हे फीचर दिल्ली-एनसीआर, मुंबई, बेंगळुरू, चेन्नई आणि कोलकातासह भारतातील ३७ शहरांमध्ये आणणार आहे. पालक आता त्यांच्या किशोरवयीन मुलांना सुरक्षित आणि स्वतंत्र उबर राइड्सचा आनंद घेण्याची परवानगी देऊ शकतात.

किशोरवयीन मुलांसाठी उबर कसे काम करते?

तर पालक खालील स्टेप्स फॉलो करून किशोरवयीन मुलांसाठी उबर बूक करून देऊ शकताततुमच्या किशोरवयीन मुलांना त्यांच्या खात्याचा वापर करून उबर पवर इन्वाईट करा.त्यानंतर किशोरवयीन मुलांना त्यांच्या पालकांच्या खात्याशी जोडलेले त्यांचे स्वतःचे उबर खाते तयार करावे लागेल.त्यामुळे आता पालक त्यांचे स्थान ट्रॅक रिअल-टाइम अलर्ट मिळवू शकतात आणि त्यानंतर किशोरवयीन मुले राईड्स बुक करू शकतात.तसेच पालक सुद्धा त्यांच्या किशोरवयीन मुलांच्या वतीने देखील राईड्स बुक करू शकतातकिशोरवयीन मुलांसाठी सुरक्षा उपायउच्च रेटिंग असलेले असाईन ड्रायव्हर्स किशोरवयीन राइडसाठी नियुक्त केले जातील. राइड लोकेशन लॉक केले जातील, ज्यामुळे ड्रायव्हर्स लोकेशनमध्ये कोणताही बदल करू शकणार नाहीत.अधिक सुरक्षिततेसाठी किशोरवयीन मुले राइड दरम्यान ऑडिओ रेकॉर्ड करू शकतात.तसेच मुलांना फक्त मागच्या सीटवर बसण्याची परवानगी आहे आणि सीट बेल्ट अनिवार्य आहेत.याव्यतिरिक्त, उबर रायडर्स पालकांच्या संमतीनेच इतर किशोरवयीन मुलांबरोबर (१३-१७ वयोगटातील) प्रवास करू शकतात. एकदा रायडर १८ वर्षांचा झाला की, त्यांचे उबर फॉर टीन्स अकाउंट आपोआप नियमित उबर अकाउंटमध्ये रूपांतरित होईल.

# बहुआयामी व्यक्तिमत्व राजा बढे

संपादक, अभिनेते, गद्य लेखक, नाटककार, कादंबरीकार, मराठी कवी आणि गीतकार असे बहुआयामी व्यक्तिमत्व म्हणून राजा बढे यांची ओळख होती. त्यांच्या 'जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा' या गीताला राज्य गीताचा दर्जा मिळाला आहे.

राजा नीळकंठ बढे यांचा जन्म नागपुरात ७ एप्रिल १९७७ रोजी झाला. प्राथमिक शिक्षण छिंदवाडा येथे, तर माध्यमिक शिक्षण नागपूरच्या टिळक विद्यालयात झाले. १९३५मध्ये त्यांनी मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण केली. आई-वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांनी भावंडांचे पालनपोषण केले. त्यामुळे ते महाविद्यालयीन शिक्षण घेऊ शकले नाही. त्यांनी मराठीतील नावाजलेल्या विविध वृत्तपत्रांमध्ये विविध ठिकाणी नोकरी केली. नियतकालिके व साप्ताहिकांमध्येही लेखन केले. कोंडिबा' या टोपणनावाने त्यांनी राजकीय वात्रटीका लिहिल्या. त्यांचा संस्कृत काव्य आणि उर्दू शायरीचा चांगला अभ्यास होता. गीत, गझलबरोबरच चारोळीमध्येही त्यांनी रचना केल्या.

बढे यांनी १९४०च्या सुमारास सिरको फिल्म्सच्या माध्यमातून चित्रपट व्यवसायात प्रवेश केला. दोन वर्षे तेथे त्यांनी काम केले. १९४२मध्ये ते प्रकाश



निमित्त

स्टुडिओत रूजू झाले. त्यांनी रामराज्य चित्रपटाची गाणी लिहिली. महेश कौल यांच्यासोबत अंगुरी चित्रपटात काम केले. धाडिले राम तिने का वनी या नाटकासाठी त्यांनी अभिरामा सुखधामा हे भैरवी रागातील नाट्यगीत लिहिले व पंडित जितेंद्र अभिषेकी यांनी ते गायले. आपल्या बंधूंच्या साहाय्याने स्वानंदचित्र ही चित्रपट संस्था स्थापली.

छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित रायगडचा राजबंदी हा चित्रपट बढे यांनी काढला. याच चित्रपटासाठी त्यांनी रचलेले उधं गं अंबे उधं हे लोकगीत शाहीर पिलाजीराव सरनाईक यांनी गायले. आकाशवाणीवर निर्माता म्हणून १९५६ ते १९६२ या कालखंडात त्यांनी काम केले. नोकरी सोडल्यावरही त्यांनी आकाशवाणीला छोटे छोटे माहितीपट करून दिले. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांवर एक चित्रपट निर्माण केला.

बढे यांनी रचलेली कळीदार कस्तुरी पान ही लावणी श्रीनिवास खळे यांनी संगीतबद्ध केली व सुलोचना चव्हाण यांनी गायली. त्यांच्या कवितांवर स्वातंत्र्यवीर सावरकरांचा प्रभाव दिसतो. क्रांतिमाला या संग्रहात देशभक्तिपर २१ कविता आहेत. त्यांच्या साहित्य संपदेमध्ये १८ काव्यसंग्रह, चार नाटके, नऊ संगीतिका, पाच एकांकिका, एक कादंबरी यांचा समावेश आहे. महाराष्ट्राचा प्राचीन राजा हाल सातवाहन ह्याच्या काव्यांचे संकलन असलेल्या गाथा सप्तशतीचा मराठी अनुवाद त्यांनी केला.

नागपुराती महाल परिसरात त्यांचे निवासस्थान होते. त्यांचे ७ एप्रिल १९७७ रोजी निधन झाले. महापालिकेने तेथे स्मारक बांधले. या स्मारकाच्या माध्यमातून त्यांची स्मृती जपली जात आहे. मुंबईतील कवी राजा बढे चौक त्यांच्या नावावर आहे. नागपूरच्या महाल पेठेतील सी.पी. अॅण्ड बेरार महाविद्यालयासमोरील चौकासही राजा बढे यांचे नाव दिले आहे.

(साभार : इंटरनेट)

**बातमीतील बात**






## आरोग्य प्रहर

### फ्लिप-फ्लॉप घातल्यावर काय नुकसान होते?

स्लीपर्स आणि चप्पलमध्ये सध्या ट्रेंडमध्ये आहे ती 'फ्लिप फ्लॉप' चप्पल. बिचवेअर म्हणून तरुण मंडळींमध्ये फ्लिप-फ्लॉपची वेगळीच क्रेज आहे. पण, आता रोजच्या वापरासाठी या फ्लिप फ्लॉपचा उपयोग अनेक जण करू लागले आहेत. कार्टून्स, इमोजी, काही मजेशीर मजकूर लिहिलेले फ्लिप फ्लॉप बाजारात विविध रंगांत आणि स्टाईलमध्ये उपलबध असतात. पण, तज्ज्ञांनी मधुमेही असलेल्यांना मात्र या फॅन्सी चप्पल घालणे टाळण्याचा सल्ला दिला आहे. मधुमेह असलेल्या लोकांनी फ्लिप-फ्लॉप



किंवा ओपन टोज चप्पल घालणे टाळावे. तज्ज्ञांच्या मते, फ्लिप-फ्लॉपवर असणाऱ्या या पट्ट्या पायाच्या काही भागांवर दाब देऊ शकतात, ज्यामुळे फोड येऊ शकतात, ज्यावर मधुमेहींमध्ये उपचार करणे कठीण असू शकते; त्यामुळे फ्लिप-फ्लॉप वापरू नये, कारण बहुतेक मधुमेहींना डायबेटिक पेरिफेरल न्यूरोपॅथी असते, ज्यामध्ये पाय सुन्न होणे किंवा मुंग्या येणे अशी लक्षणे दिसून येतात. पायाच्या पहिल्या बोटाच्या आणि दुसऱ्या बोटाच्या दरम्यानच्या पट्ट्यांमुळे घर्षण किंवा जखम होऊ शकते फ्लिप-फ्लॉपमुळे रेती आणि लहान दगड सहज आतमध्ये जातात याव्यतिरिक्त, फ्लिप फ्लॉपमध्ये लहान बोटांना नखे येणे ही एक सामान्य गुंतागूंत आहे. कारण शरीर स्विंग फेजमध्ये असताना हे फ्लिप-फ्लॉप पकडण्याचा प्रयत्न करते असे डॉक्टर पवन सांगतात

मधुमेही असलेल्या लोकांनी टाचांच्या भागाला पट्टा असलेली चप्पल निवडावी; जो स्विंग फेज दरम्यान या फ्लोटरला जागी ठेवतो. चप्पलच्या सीमलेस इनर्स, वाईड टो बॉक्स, मऊ, टिकाऊ आतील सोल बघणे आवश्यक असते, तज्ज्ञ असेही सुचवतात की, चांगला आधार आणि फिटिंग लेस असलेले शूज घाला

प्रो टीप : मधुमेह असलेल्या लोकांना दिवस संपत असताना शूज वापरण्याचा सल्ला दिला जातो, कारण त्या वेळी तुमचे पाय थोडे सुजण्याची शक्यता असते. असे मानले जाते की, जर त्या वेळी शूज आरामदायी असतील तर ते दिवसाच्या उर्वरित वेळेतदेखील आरामदायी राहिले पाहिजेत. चांगला सपोर्ट मिळणारे शूज खरेदी करा. मधुमेही म्हणून तुमच्या गरजा लक्षात ठेवून पोडियाट्रिस्ट किंवा पायाच्या डॉक्टरांशी बोलणेदेखील उचित ठरेल, असा डॉक्टरांनी सल्ला दिला आहे.

# आमदार रविशेठ पाटील यांची सेझ जमिनीबाबत महसूलमंत्र्यांशी चर्चा

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील एसईझेडसाठी घेतलेल्या जमिनी शेतकऱ्यांना परत कराव्यात अशी शेतकऱ्यांची मागणी असल्याने शेतकऱ्यांचे प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी आमदार रविशेठ पाटील यांनी विधानभवनात उपस्थित केलेल्या लक्षवेधी प्रश्नाच्या माध्यमातुन रिलायंस एसइझेड प्रकल्प बाधीत शेतकरी संदर्भातील बैठक नुकतीच महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या दालनात घेण्यात आली.

या प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांनी वस्तूस्थितीदर्शक सविस्तर माहितीचा अहवाल आणि प्रस्ताव शासनास पाठवावा असे निर्देश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत. तसेच याबाबत मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून आवश्यक ता भासल्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेण्यात येईल, असेही मंत्री. बावनकुळे यांनी बैठकीप्रसंगी सांगितल्याचे उपस्थितांकडून सांगण्यात आले आहे. यावेळी आमदार रविशेठ पाटील, आमदार विक्रांत पाटील, अँड. नंदू म्हात्रे, मोहन नाईक, गंगाधर ठाकूर, नारायण म्हात्रे, काशिनाथ पाटील आदी शेतकरी प्रतिनिधी उपस्थित होते.



# पेण एसटी स्थानकात पाच नवीन बसेस दाखल

◆ आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते पूजन



**पेण : प्रतिनिधी**

पेण एसटी आगारात पाच नवीन बसेस दाखल आल्या आहेत. या नवीन गाड्यांचे आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते पूजन करण्यात आले

एसटीचा प्रवास हा सुरक्षित असल्याने कामगार गृहिणी व विद्यार्थी वर्ग एसटीनेच प्रवास करतात. मात्र एसटी बसेस कमी पडू लागल्या आहेत. परिवहन महामंडळाच्या मुंबई कार्यालयामार्फत पेण एसटी आगारासाठी पाच नवीन बसेस देण्यात आल्या आहेत. पेण एसटी आगारात या ५ नवीन गाड्यांचे आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते पूजन करण्यात आले.

या कार्यक्रमास उपयंत्र अभियंता चव्हाण, सहाय्यक वाहतूक अधीक्षक मनीषा पाटील, पेण आगार प्रमुख अपर्णा वर्तक, स्थानक प्रमुख आलोक गायकवाड, वाहतूक निरीक्षक स्वाती मोकल, कार्यशाला अधीक्षक अनिल पाटील, सहाय्यक वाहतूक निरीक्षक घोटणे, जटाले, पी.ए. पाटील यांच्यासह पर्यवेक्षकीय कर्मचारी, चालक, वाहक चालक तथा वाहक व यांत्रिक कर्मचारी उपस्थित होते.

# भाजपशिवाय माथेरानचा विकास अशक्य विकासाच्या मुद्द्यावर सर्वपक्षीयांची एकजूट

**माथेरान : बातमीदार**

तीन ते चार पिढ्यांनी माथेरान मध्ये संघर्षमय जीवन जगत असताना निदान भावी पिढीच्या वाट्याला सुगीचे दिवस यायला हवेत यासाठी आता शेवटचा पर्याय म्हणून भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून गावाला विकासाच्या दिशेने नेण्यासाठी एकमेव पर्याय उरलेला असल्याने येथील सर्वपक्षीय नेत्यांनी राजकारण बाजूला ठेवून भाजपच्या वरीष्ठ नेत्यांची भेट घेऊन गावाच्या व्यथा कथन केल्या आहेत.

माथेरान मधील सर्वपक्षीय मंडळींनी शुक्रवारी (दि. ४) रोजी पनवेल येथे जाऊन भाजपचे कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांची भेट घेऊन माथेरान मधील स्थानिकांना त्याचप्रमाणे येणाऱ्या पर्यटकांना अभिप्रेत असणाऱ्या समस्यांचा संपूर्ण पाढाच वाचून दाखवला.आजवर अनेकांनी इथल्या अल्प मतांचा स्वतः च्या फायद्यासाठी उपयोग करून घेतला आणि निवडून आल्यावर सर्वांच्या तोंडाला पाने पुसली आहेत.मतांच्या राजकारणापायी इकडे लक्ष दिले जात नाही हे अनेक वर्षांपासून घडत आले आहे. ज्या वेळी इथे विकासात्मक बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले गेले त्यावेळी लोकप्रतिनिधींनी अप्रत्यक्षपणे विरोधाचीच भूमिका पार पाडली आहे याचा अनुभव माथेरानकरांना आजही पहावयास मिळत आहे. यासाठी सर्वपक्षीय नेत्यांनी एकत्रित येऊन भाजपचे कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची प्रत्यक्ष



भेट घेऊन निवेदन सादर केले आहे.

भाजप शिवाय माथेरानचा विकास अशक्य असल्याने आता पक्षीय राजकारण बाजूला ठेवून सर्वपक्षीय नेत्यांनी एकत्रित येऊन आपल्या गावात विकासाची गंगा आली पाहिजे, सर्वांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हायला हव्यात, सुशिक्षित बेरोजगार युवकांना व्यवसायाची संधी निर्माण व्हावी, वाहतुकीची गहन समस्या दूर होऊन पर्यटनास चालना मिळाली पाहिजे पनवेल धोदाणी मार्गे माथेरान फिनिक्युलर रेल्वे प्रकल्प असो किंवा कर्जत भिवपुरी मार्गे रोप वे प्रकल्प ही प्रस्तावित कामे भारतीय जनता पक्षाशिवाय अन्य कुणीही करूच शकत नाही याचा अंदाज माथेरान करांना आल्यामुळे सर्वपक्षीय मंडळींनी भाजपचे कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांची भेट घेतली असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घडवून देण्याचे आश्वासन ठाकूर यांनी दिले आहे.

आमचे माथेरानवर विशेष प्रेम असून रायगड जिल्ह्यातील हे सुप्रसिद्ध पर्यटनस्थळ असल्याने येथील स्थानिकांच्या व्यथा आम्हाला ज्ञात आहेत. ई रिक्षा बाबतीत ज्या समस्या आहेत त्या सुध्दा मार्गी लावण्यासाठी निश्चितच प्रयत्न केले जातील असे आश्वासन यावेळी त्यांनी उपस्थित शिष्टमंडळाला दिले या ठिकाणी लक्ष केंद्रित करून स्थानिकांना न्याय मिळवून देण्यासाठी भारतीय जनता पक्षाचे वरीष्ठ नेते माथेरानच्या एकंदरीत भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास करून पर्यटन क्रांती घडवून आणण्यासाठी निश्चितच प्रयत्न करतील हा आशेचा किरण सर्वांना दिसून येत असल्याने माथेरान हे भाजपमय होण्याची तयारी दर्शवली आहे.

या वेळी उबाठा गटाचे शहरप्रमुख कुलदीप जाधव,प्रसाद सावंत,राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अजय सावंत,महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष संतोष कदम, व्यापारी संघटना अध्यक्ष राजेश चौधरी, भाजपचे आकाश चौधरी, भाजप अध्यक्ष प्रवीण सकपाळ, प्रदीप घावरे, मराठा समाज अध्यक्ष चंद्रकांत जाधव,माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर, विवेक चौधरी,शिवाजी शिंदे, रिक्षा संघटनेचे अध्यक्ष शकील पटेल, सचिव सुनील उपस्थित होते.

# रेवदंडा खाडी गाळात रूतल्याने ऐतिहासिक बंदराचा ऱ्हास

**रेवदंडा : प्रतिनिधी**

सोळाव्या शतकाच्या पहिल्या दशकात पोर्तुगिजांनी येथे पाय रोवल्यापासून रेवदंडा–चौल बंदराचे महत्व खुप वाढून ते देशी व विदेशी व्यापाराचे महत्वाचे केंद्र होते. परंतू अरबी समुद्राला जोडणार्या कुंडलिका समुद्रखाडीमुखात गाळ साचल्याने हे आंतरराष्ट्रीय बंदर लयास जाऊन र्हास झाले. बंदर मुखाशी वाळू साचल्याने मोठया बोटी येथे येणे बंद झाले.



पोर्तुगिजांच्या आगमनापर्यत रेवदंडा महत्वाचे बंदर पश्चिमेकडून येणार्या वादळी वार्यापासून सुरक्षीत होते. पुर्वी जिल्हातील जलवाहतुक प्रामुख्याने गलबतांने होई. स्थानिक शिडाच्या गलबतात बाम्बोट, मंचवा पडाव, धरब, म्हांगिरी, फटेमारी, कोठीया आणि बेटेलो हे प्रकार होते. तेव्हा रेवदंडाहून होणार्या व्यापाराची प्राप्ती रेवदंडा खाडीच्या मुखाशी होणार्या रोहयाच्या व्यापाराच्या प्राप्तीत सामाविष्ट होत असे.

सन १५८६मध्ये व्हेनिसहून आलेल्या प्रवासी सीझर फ्रेडरिक यांने बंदराचे तोंडाशी सर्व बाजूंनी मजबूत भिंतीचे सुरक्षीत असलेले पोर्तुगिज शहर रेवदंडा आणि नदीच्या मुखापासून सुमारे २.४२ कि.मी. अंतरावर असलेले मुर किंवा मुसलमान शहर चौल या शहरांचा उल्लेख केला असून ही दोन्ही बंदरे व्यापारी बंदरे होती असा उल्लेख केला आहे. या बंदर किनारावरून नारळ, मसाळयाचे पदार्थ, व औषधे तसेच पोर्तुगाल, मक्का, व चीनमधून सॅन्डल, रेशीम व रेशमी वस्त्रे, मखमल, शेंदरी रंगाचे कापड,चिनी मातीची भांडी, इत्यादी वस्तू आयात केल्या जात होत्या. तसेच येथून लोखंड, बोरेक्स,हिंग,धान्य, नीळ, अफू, विविध प्रकारचे रेशीम आणि शुभ्र व छापील रंगीत, सुती कापड, व कपडे भारतातील इतर ठिकाणी आणी मलाका,चीन, आर्मुज, पुर्व आफ्रिका, पोर्तुगालकडे निर्यात केल्या जात होत्या. चौलच्या आजूबाजूचे लोक मोठया प्रमाणात रेशमी कापत विणीत, व काचेचे मणी तयार करून मोठया प्रमाणात आफ्रिकेत पाठवीत असे वर्णन लिहीले आहे.

फ्रेच प्रवासी फॅन्कॉइस पायरार्ड यांनी सन १६०१ ते १६०८ या दरम्यान प्रवासाचे वर्णन करताना म्हटले आहे की, चौल हे चांगले हवामान, अतिशय सुबत्ता असलेले व्यापारी केंद्र, व सरक्षंणदृष्टा मजबूत शहर असा उल्लेख केला असून अप्पर चेऊल येथे अतिशय कुशल व मेहनती कारागीर होते फर्निचर बसनवून त्यांचे लाखेचे बहुरंगी रांगण करीत, येथे सुंदर सुती, कापड तसेच चिनी रेशमी कापडापेक्षाही उत्तम रेशमी कापड तयार करत होत असल्याचा उल्लेख त्यांनी केला आहे.

पोर्तुगीजांचा र्हास झाल्या नंतर येथे समुद्रखाडी मुखाजवळ गाळ साचल्याने मोठी मोठी जहाने बंदरात लागण्यास समस्या निर्माण झाली, त्यामुळे पुढे मुंबई हे मुख्य बंदर अस्तित्वात येऊन रेवदंडा बंदराचा र्हास झाला.सन१९८५–८६मध्ये रेवदंडा खाडीवरील पुल बांधून पुर्ण होईपर्यंत रेवदंडा–मुंबई जलमार्गातील एक उपयुक्त सागरी बंदर होते. या बंदरात अलिकडच्या काळात रेवदंडा व पलिकडील साळाव येथे दोन धक्के बांधले गेले.

# शोध समाधानाचा ग्रुपच्या वयोवृद्ध महिलांचा वार्षिक आनंदोत्सव

**महाड : प्रतिनिधी**

आपल्या उतरत्या काळामध्ये देखील आनंदी राहायला पाहिजे, जीवनाचा प्रत्येक क्षण आनंद घेतला पाहिजे, या हेतूने वयोवृद्ध महिलांनी स्थापन केलेल्या शोध समाधानाचा ग्रुपचा वार्षिक आनंदोत्सव नुकताच साजरा झाला. यावेळी त्यांनी सादर केलेल्या मनोरंजनात्मक कार्यक्रमांतुन आनंदाला वयाचं बंधन नसतं हेच दिसून आलं.



शोध समाधानाचा या ग्रुपमधील महिलांचा वार्षिक आनंदोत्सव निमीत्त या महिलांनी विविध करमणुकीचे खेळ, त्याचबरोबर दांडीया नृत्य असे विविध मनोरंजनात्मक कार्यक्रम आयोजित केले होते. यामध्ये साठ ते अगदी ८५ वयाच्या महिलांनी देखील सहभाग घेतला होता. वय आणि शारीरिक व्याधी सोबत असताना देखील मनमोकळेपणाने एकमेकांशी गप्पा मारत आपल्या सुख दुःखांची देवाण – घेवाण करत या आनंदोत्सवामध्ये या महिला सहभागी झाल्या होत्या. भारतीताई मेहता यांच्या संकल्पनेतून या ग्रुपची स्थापना झाली आहे. २५ वर्ष हा ग्रुप सुरू आहे. दरवर्षी या ग्रुपच्या माध्यमातून मंदिराचे दर्शन, आवळी भोजन, इत्यादी कार्यक्रम घेतले जातात.

साठ वर्षावरील जवळपास साठहुन अधिक सदस्य या ग्रुपमध्ये सामील आहेत. आनंदोत्सवाच्या माध्यमातून जीवनाचा आनंद कसा घ्यायचा याचा जणू आदर्श इतर महिलांना त्या देत असल्याचे भारतीताई मेहता यांनी सांगितले.

# खालापूर तालुक्यात जिवंत ७/१२ मोहिमेची सुरुवात



**चौक : प्रतिनिधी**

अनेक वेळा मृत खातेदारांच्या नावावरच जमिनी राहतात, त्यामुळे त्यांच्या वारसांना मालकी हक्क मिळवण्यासाठी कोर्टाची पायरी चढावी लागते. ही प्रक्रिया वेळखाऊ आणि खर्चिक असल्याने शेतकरी त्रस्त होतात.मृत व्यक्तींची नावे सातबाऱ्यावरून कमी करून वारसांची नोंद केली जाणार आहे. ही संपूर्ण प्रक्रिया फक्त दीड महिन्यांच्या कालावधीत पूर्ण केली जाणार आहे. संपूर्ण खालापूर तालुक्यात ही मोहीम १ एप्रिल पासून राबवण्याचे आदेश देण्यात आले असून महसूल विभागाकडून प्रत्येक गावातील नोंदींचे अद्ययावतीकरण केले जाईल, असे खालापूर तहसीलदार अभय चव्हाण यांनी सांगितले.

१ एप्रिल ते ५ एप्रिल या पहिल्या टप्प्यात ग्राम महसूल अधिकारी यांनी गावात चावडी वाचन केले असून गाव निहाय मयत खातेदार यांची गाव निहाय यादी करण्यात आली आहे.६ एप्रिल ते २० एप्रिल या कालावधीत वारसा संबंधित सत्य प्रतिज्ञा पत्र, स्वय घोषणा पत्र, वारस यांचे पत्ते, भ्रमण ध्वनी क्रमांक, स्थानिक चौकशी, पंचनामा, ठराव करून फेरफार प्रणाली मंजूर करण्यात येईल.

# पाली नगरपंचायत हद्दीतील दूषित पाण्याची समस्या मार्गी

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

सुधागड तालुक्यातील पाली नगरपंचायत हद्दीत मागील काही दिवसांपासून दूषित व दुर्गंधीयुक्त पाणी पुरवठ्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. आरोग्यास हानी पोहोचवणारे हे पाणी प्यावे लागत असल्याने रोगराई पसरण्याची शक्यता वाढली होती. परिणामी, अनेक ग्रामस्थांना पिण्याचे शुद्ध पाणी विकत घ्यावे लागत होते. पाली नगरपंचायतीने या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देत पाटबंधारे विभागाशी संपर्क साधून उन्हेरे धरणातून आंबा नदीत पाणी सोडण्याची व्यवस्था केली. यामुळे दूषित पाणी आणि दुर्गंधीयुक्त पाणी पुरवठ्याची समस्या सोडवण्यात यश आले असून, नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

नगरपंचायतीच्या तातडीच्या प्रयत्नांमुळे पालीकरांना शुद्ध पाणी मिळाल्याने आरोग्याच्या धोक्यांपासून सुटका झाली आहे. नागरिकांनी नगरपंचायतीच्या प्रयत्नांबद्दल समाधान व्यक्त केले आहे.



**पाटबंधारे विभागाच्या सहकार्याने उन्हेरे धरणातून पाणी आंबा नदीत सोडण्याची व्यवस्था करण्यात आली. आमचे प्राथमिक उद्दिष्ट नागरिकांना शुद्ध आणि सुरक्षित पाणी उपलब्ध करून देणे आहे, आणि त्यासाठी आम्ही सतत प्रयत्नशील आहोत.**

**–विद्या येरूणकर,**
**मुख्याधिकारी,**
**नगरपंचायत पाली**

# सामाजिक कार्यकर्ते बिलाल मोर्बेकर यांना प्रांताधिकाऱ्यांकडून प्रशस्तीपत्र



**धाटाव : वार्ताहर**

स्वयंप्रेरणेने सामाजिक गरज ओळखून समाजसेवा करणारे बिलाल मोर्बेकर यांचा प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवड यांनी प्रशस्तीपत्र देऊन गौरव केला.

व्यवसायाने रिक्षाचालक असणारे शिवसैनिक बिलाल सध्या त्यांच्या वेगळ्याच सामाजिक कार्याने चर्चेत आहेत. वृद्ध निराधारांना त्यांच्या आजारपणात आधार देत आहेत. ज्या वयोवृद्धांना कोणी सांभाळत नाही किंवा जे मनोरुग्ण आहेत, आजारी आहेत अशा वंचितांसाठी बिलाल मोर्बेकर देवदूत बनले आहेत.

अतिवृष्टीत २०२४च्या जुलै महिन्यात रेल्वे पटरीवर दरड कोसळल्याने कोकण रेल्वेची वाहतूक ठप्प झाली होती. १३ तासाहून अधिक वेळ हजारो प्रवासी जागोजागी खोळंबले होते. अतिवृष्टीमुळे प्रवाशांना खाणे–पिणेसुद्धा मिळू शकले नव्हते, महिला, वृद्ध आणि लहान मुले यांच्यासह सर्वांचेच हाल झाले होते. रोहा रेल्वेस्थानकात खोळंबलेल्या ट्रेनमधील प्रवाशांसाठी जेवणाची व्यवस्था व धीर देण्याचे मोठे कार्य त्यांनी केले होते.


**रोहा नगर परिषद**
ता. रोहा, जि. रायगड
पिन कोड नं. ४०२१०९
email : rohanagarpalika@gmail.com

क्र. रोनप/बांवि/ई–निविदा सुचना/१८/२०२५ दिनांक ०४/०४/२०२५

**जाहिर ई–निविदा सूचना**

रोहा नगरपरिषद हद्दीतील विकास कामाकरिता कामाचा अनुभव असणाऱ्या ठेकेदाराकडून विहित नमुन्यात ई–निविदा मागविणेत येत आहेत. सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई–निविदाद्वारे ऑनलाईन पद्धतीने संगणक प्रणालीवर होईल. सदर निविदा सुचना प्रसिद्धी, आवश्यक असणारी कागदपत्रे, शुद्धीपत्र इत्यादी माहिती https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ०७/०४/२०२५ रोजीपासून उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. निविदा सादर करण्याची अंतिम तारीख दिनांक २२/०४/२०२५ रोजीपर्यंत राहील.

सही/–
(अजयकुमार एडके)
मुख्याधिकारी
रोहा नगर परिषद

# उरण पूर्व विभागात लवकरच एनएमएमटी

## मंत्री गणेश नाईक यांचे जनता दरबारमध्ये आश्वासन

**उरण : बातमीदार**

नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी मंत्री गणेश नाईक यांनी वाशी येथे जनता दरबार भरविला होता. या जनता दरबारात उरणमधील सामाजिक कार्यकर्ते गोरख ठाकूर यांनी उरणच्या समस्या मांडल्या व त्या समस्या सोडविण्याचे आश्वासनदेखील मिळाले. त्यानुसार उरण पूर्व विभागामध्ये एनएमएमटी बससेवा सुरू करणार असल्याचे आश्वासन मंत्री नाईक यांनी दिले.

जनता दरबारमध्ये विविध भागातून आलेल्या नागरिकांनी वेगवेगळे प्रश्न मांडले, वेगवेगळ्या समस्या मांडल्या. उरणमधील समस्या सुटाव्यात या अनुषंगाने उरण पूर्व विभागातील एनएमएमटी ची बससेवा सुरू होण्यासाठी मंत्री गणेश नाईक यांची खोपटे गावातील सामाजिक कार्यकर्ते गोरख रामदास ठाकूर ह्यांनी भेट घेतली.



गोरख ठाकूर यांनी मंत्री गणेश नाईक यांना पूर्व विभागात बस सुरू करण्याची व बसफेऱ्या वाढविण्याची मागणी करत निवेदन दिले.

या वेळी एनएमएमटी (नवी मुंबई परिवन विभाग) चे जनरल मॅनेजर योगेश कडूसकर हे ही सुद्धा तिथे उपस्थित होते. लवकरच उरण पूर्व विभागातून जुईनगर ते कोप्रोली व कळंबोली ते कोप्रोली ही बस सेवा पुन्हा सुरू करण्यात येईल असे मंत्री महोदयांकडून सांगण्यात आले आहे. या वेळी दिवंगत कै. निलेश शशिकांत म्हात्रे ह्याला एनएमएमटी प्रशासनाकडून मदत करण्यात आली म्हणून योगेश कडूसकर (जनरल मॅनेजर एनएमएमटी) ह्यांचा सत्कार करण्यात आला. कै. निलेशचे काका अविनाश म्हात्रे व भाऊ विनय म्हात्रे हे उपस्थित होते.

या जनता दरबारात उरण मधील सामाजिक कार्यकर्ते गोरख ठाकूर यांनी उरणच्या समस्या जनता दरबारात मांडल्या व त्या समस्या सोडविण्याचे आश्वासनदेखील मिळाले. गोरख ठाकूर यांनी केलेल्या पत्रव्यवहाराला, मागणीला सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून त्यांच्या या मागणीमुळे उरण तालुक्यातील पूर्व विभागात लवकरच एनएमएमटी बससेवा सुरू होणार आहे. त्यामुळे पूर्व विभागातील जनतेने गोरख ठाकूर यांचे आभार मानत समाधान व्यक्त केले आहे.



**पनवेल : भाजप स्थापना दिनाच्या अनुषंगाने राज्याचे कार्यकुशल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ऑनलाईन मार्गदर्शन करून संबोधित केले. भाजप तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत उरण मतदारसंघातील पळस्पे, कोळखे, डेरवली, कोन गाव, गुळसुंदे जिल्हा परिषद केळवणे जिल्हा परिषदेच्या क्षेत्रातील सर्व पदाधिकारी, शक्तिकेंद्र प्रमुख, बूथ अध्यक्ष व कार्यकर्त्यांनी शिरढोणचे ग्रामपंचायत सदस्य विजय भोपी यांच्या निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ऑनलाईन संवादाचा लाभ घेतला.**











**पनवेल : रामनवमीनिमित्त भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी तालुक्यातील देवीचापाडा, ढोंगऱ्याचा पाडा, उमरोली, हरिग्राम आदी ठिकाणी आयोजित कार्यक्रमांना भेटी दिल्या आणि दर्शन घेतले. या वेळी भाजप तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी, ओबीसी सेलचे जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, माजी पं.स.सदस्य भूपेंद्र पाटील तसेच ज्ञानेश्वर ढोंगरे, हरिशेठ फडके, अंकुश ढोंगरे, शैलेश माळी, भगवान ढोंगरे आदी उपस्थित होते.**

# डी.डी. विसपुते कॉलेजला ‘नॅक’तर्फे बी प्लस श्रेणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल येथील श्री बापूसाहेब डी. डी. विसपूते कॉलेज ऑफ एज्युकेशनचे राष्ट्रीय मुल्यांकन व मान्यता परिषद (नॅक) बंगळुरूतर्फे नुकतेच मुल्यांकन करण्यात आले. ज्यामध्ये महाविद्यालयास नॅकतर्फे बी+ श्रेणी प्राप्त झाली.

भारत सरकार व युजीसी कडून उच्च शिक्षण संस्थांचे मुल्यांकन करण्याचे कार्य नॅक ह्या स्वायत्त संस्थेद्वारे केले जाते. महाराष्ट्र सरकार च्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाद्वारे सर्व विद्यापीठांनी व महाविद्यालयांनी सक्तीने मुल्यांकन करून घ्यावे अशा सूचना सुद्धा देण्यात आल्या आहेत. श्री बापूसाहेब डी.डी. विसपूते कॉलेज ऑफ एज्युकेशन, नवीन पनवेलने नॅकच्या दुसऱ्या फेरीमध्ये मूल्यांकनासाठीचा घेतलेला निर्णय. गुणवत्तेला अग्रक्रम देत आदर्श शैक्षणिक समूहाचे चेअरमन धनराजजी विसपुते व संचालिका



सौ. संगीता विसपुते यांच्या प्रेरणेने व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सीमा कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातर्फे शैक्षणिक वर्ष २०१९-२०२३ ह्या शैक्षणिक वर्षासाठी नॅकतर्फे दुसऱ्यांदा मुल्यांकन करण्यात आले. यामध्ये नॅकतर्फे निर्दे शित केलेल्या ७ निकषांच्या आधारे महाविद्यालयातील शैक्षणिक कार्याचे गुणात्मक व संख्यात्मक मुल्यांकन करण्यात आले.

महाविद्यालयातील गुणात्मक बाबींचे मुल्यांकन करण्यासाठी नॅकच्या त्रिसदस्य समितीने महाविद्यालयास भेट दिली. ज्यामध्ये महाराजा सयाजी विद्यापीठ, गुजरात येथील प्रा.पुष्पानाधम करनम, समिती अध्यक्ष, प्रा.सी. मधुमथी, ओस्मानिया विद्यापीठ तेलंगाना, समिती समन्वयक सदस्य व डॉ. अल्बर्ट डखार, सेंट अन्थोनीस महाविद्यालय, मेघालय, समिती सदस्य यांचा सहभाग होता.

भेटीदरम्यान समितीने महाविद्यालयात असलेल्या भौतिक सुविधा, विद्यार्थी सेवा तसेच शैक्षणिक, आर्थिक व मानवी संसाधनांची पाहणी केली तसेच महाविद्यालयाने गुणवत्ता वाढीसाठी केलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले व महाविद्यालयास पुढील गुणवत्ता वाढीसाठी महत्त्वपूर्ण अशा सूचना केल्यात. महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी संपूर्ण नॅकच्या प्रक्रियेत आपले महत्वाचे योगदान दिले.

नॅकच्या ह्या प्रक्रियेतील सहकार्याबद्दल महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सीमा कांबळे यांनी मुंबई विद्यापीठाचे तसेच महाविद्यालयाशी संलग्न असणाऱ्या सर्व आंतरतरवासिता शाळा, सामाजिक संस्था व शैक्षणिक भागीदारांचे आभार मानलेत. या यशस्वीतेसाठी विभाग प्रमुख प्रा.विनायक लोहार, आयक्यूसी समन्वयक प्रा.प्रितेश वाढे, प्रा.नेहा मात्रे, प्रा.अनिल गुरव, प्रा.राजू गायकवाड, प्रा.निलेश अडसुळे, इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



**पनवेल : भाजप स्थापना दिनानिमित्त पक्षाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी त्यांच्या निवासस्थानी सहकुटुंब ध्वजारोहण केले.**

# शिष्यवृत्ती परीक्षेत नवी मुंबई मनपा शाळेतील १६२ विद्यार्थी झळकले

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत दरवर्षी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना परीक्षेचे आयोजन केले जाते. सदर परीक्षा शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता २२ डिसेंबर २०२४ रोजी घेण्यात आली होती. या परीक्षेमध्ये महानगरपालिका शाळांमधून ११२५ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. त्यापैकी १६२ विद्यार्थी गुणवत्ता यादीमध्ये झळकले असून त्यांच्या यशामुळे नवी मुंबई महापालिकेच्या शिक्षण व्हिजनच्या मुकुटात मानाचा तुरा खोवला गेला आहे.

या यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्रमांक ४२, घणसोली गाव मधील स्वराली विठ्ठल जगधने ही विद्यार्थिनी ठाणे जिल्ह्यातून तिसरी आली असून नवी मुंबईतून प्रथम क्रमांकाने यशस्वी झालेली आहे.

नवी मुंबई महापालिका शाळा क्रमांक ५५, राजश्री शाहू महाराज विद्यालय, आंबेडकर नगर, कातकरी पाडा, रबाळे येथील यश तुळशीराम खरगे हा विद्यार्थी गुणानुक्रमे नवी मुंबईतून व्दितीय क्रमांकांने शिष्यवृत्तीप्राप्त ठरलेला आहे.

या शिष्यवृत्ती परीक्षेसाठी शालेय क्षमता चाचणी आणि बौद्धीक क्षमता चाचणी असे दोन पेपर निश्चित केलेले असतात. केंद्र शासनाने निश्चित केलेल्या कोटयाप्रमाणे जिल्हानिहाय आणि संवर्गनिहाय विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी तयार करण्यात येते. शिष्यवृत्तीस पात्र ठरलेल्या विद्यार्थाना दरवर्षी १६ हजार रुपये शिष्यवृत्ती चार वर्षांपर्यंत (नववी ते बारावी) दिली जाते.

या परीक्षेमध्ये शासकीय तसेच अनुदानित शाळेतील विद्यार्थीही परीक्षेस बसले होते. या परीक्षेत सातवीमध्ये किमान ५५% गुण मिळवलेले इयत्ता आठवीमध्ये शिकत असलेले विद्यार्थी परीक्षेस पात्र ठरतात. तसेच त्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ३.५ लाख किंवा त्यापेक्षा कमी असणे आवश्यक असते.

# डॉ. बाबासाहेबांनी समतेच्या विचारांचे अमृतरोप फुलविले -प्रा. प्रवीण दवणे

**नवी मुंबई : बातमीदार**

आयुष्यात आलेल्या नकाराला जिद्दीचा होकार भरणारे व संकटाचे खत करुन त्यातून समग्र समाजाचा विचार करून अमृताचे रोप फुलविणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही भारताची पुण्याई असल्याचे सांगत साहित्यिक, व्याख्याते प्रा. प्रवीण दवणे यांनी बाबासाहेबांचे आभाळाएवढे व्यक्तीमत्व बालपणापासून कसे घडत गेले हे विविध प्रसंग कथन करीत प्रभावीपणे मांडले.

बाबासाहेबांचे उत्तुंग कर्तृत्व आपण जाणतोच, पण त्यांचे युवक म्हणून घडणे आणि देशातील युवक घडण्यासाठी त्यांनी वेळोवेळी केलेले मार्गदर्शन हे सूत्र पकडून ‘युवकांचे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर’ या



विषयावर प्रा. प्रवीण दवणे यांनी नवी मुंबई महापालिकेच्या वतीने ऐरोली येथील ‘जागर’ व्याख्यानमालेत उपस्थितांशी हृदयसंवाद साधला.

यामध्ये त्यांनी बाबासाहेबांचे लहानपणापासूनचे प्रतिकूल परिस्थितीशी झुंजा देत घडत जाणे छोटया छोटया गोष्टींतून सांगितले. शब्द सापडण्याआधी त्यांना समाजातील जळती प्रश्नचिन्हे सापडली आणि त्याची उत्तरे शोधता शोधता ग्रंथांच्या वाचनातून मिळालेल्या ज्ञानातून व देशातील तसेच परदेशातील वातावरणाचा अनुभव घेऊन ते घडत गेले. शिक्षणाचा ध्यास घेत, प्रचंड प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत त्यांनी ध्येयपूर्तीच्या दिशेने निग्रहाने वाटचाल केली. अभावातला भाव माणूस घडवितो हे बाबासाहेबांचे जीवन चरित्र पाहिल्यानंतर लक्षात येते. पोकळीचे पंख करतात ते असामान्य होतात अशा शब्दात बाबासाहेबांच्या कर्तृत्वाचा गौरव करीत प्रा. प्रवीण दवणे यांनी आपल्या तरुणाईला सगळे हातात देण्याऐवजी संघर्ष करुन मिळविण्याची सवय लागू द्या, असा संदेशही उपस्थितांना दिला.

# जासई विद्यालयात चावडी वाचन व गणन कार्यक्रम



**उरण : बातमीदार**

निपूण महाराष्ट्र अभियान अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी प्रथम भाषा व गणित या विषयांसाठी कृती कार्यक्रम राबविण्यात येत आहे, त्या अनुषंगाने रयत शिक्षण संस्थेच्या जासई येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा.पाटील ज्युनिअर कॉलेजमध्ये शनिवारी (दि.५) चावडी वाचन व गणन कार्यक्रम झाला.

विद्यालयाच्या प्राचार्या के.जी. म्हात्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमामध्ये पाचवीत शिकणारे विद्यार्थी शाळेच्या मैदानावर बसून वाचन करीत होते. या कार्यक्रमासाठी विद्यालयाच्या पर्यवेक्षिका के.एस मुकादम, इयत्ता पाचवीच्या वर्गशिक्षिका पी.जे घरत, के. के म्हात्रे, एम.एस ठाकूर, प्रा. एस.बी. गाताडी व इतर सेवक वर्ग उपस्थित होते.

विद्यालयात वर्षभर विविध शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन केले जाते, यामध्ये रयत शिक्षण संस्थेमार्फत व शासनाच्या शैक्षणिक खात्याअंतर्गत असणारे उपक्रम राबवितो. त्याचबरोबर विविध स्पर्धा परीक्षांचीदेखील तयारी करून घेतली जाते त्यामधील एनएमएमएस परीक्षेत वेदिका अजय पाटील, वेदाक्षी उत्तम ठाकूर आणि इन्स्पायर अवॉर्डमध्ये यश राजेभाऊ प्रधान नववी हे विद्यार्थी यशस्वी झाले आहेत.

सन २०२५-२६ या पुढील शैक्षणिक वर्षापासून या विद्यालयात शालेय विद्यार्थ्यांना आर्टिफिशियल इंटेलिजन्स हा विषय शिकविला जाणार आहे, विद्यार्थ्यांनी रयत शिक्षण संस्थेमध्ये प्रवेश घ्यावा, असे आवाहन या निमित्ताने प्राचार्या के.जी. म्हात्रे यांनी केले आहे.

# पोलादपूर तालुक्याचा मागासलेपणाचा ठपका काढण्याचा प्रयत्न -आमदार दरेकर

**पोलादपूर : प्रतिनिधी**

केवळ विविध विकासकामांद्वारेच नव्हे तर वैयक्तिक लाभाच्या प्रकल्पांद्वारे रोजगार निर्मिती करून पोलादपूर तालुक्याचा मागासलेपणाचा ठपका काढण्याचा प्रयत्न करू, असा विश्वास आमदार प्रवीण दरेकर यांनी व्यक्त केला.

पोलादपूर साखर येथील गोविंद चोरगे याच्या उद्योगासह पोलादपूर तालुक्यामध्ये प्रधानमंत्री ग्राम सडक योजनांतर्गत मंजूर झालेल्या कामांचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी खडकवाडी ते चिखली ते खोतवाडी सिमेंट काँक्रीट रस्ता ४ कोटी ३४ लक्ष, कामथे ते चांदले ते धनगरवाडी सिमेंट काँक्रीट रस्ता ५ कोटी ६२ लाख रुपये या मोठया कामांचा भूमिपूजन सोहळा रोजगार हमी मंत्री नामदार भरतशेठ गोगावले, विधानपरिषद गटनेते आमदार प्रवीण दरेकर यांच्या हस्ते प्रमुख उपस्थितीत झाला तसेच यावेळी साखर येथे गोविंद चोरगे यांच्या सावित्री पॅकेज एँड ड्रिंकिंग वॉटर प्लांटचे उदघाटन आ. प्रवीण दरेकर यांच्याहस्ते करण्यात आले.





या वेळी मुंबई हौसिंग फेडरेशनचे अध्यक्ष प्रकाश दरेकर, माजी झेडपी उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे, माजी तालुकाध्यक्ष प्रसन्ना पालांडे, तालुकाध्यक्ष तुकाराम केसरकर, भाजपा दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष मनोज भागवत, शिवसेना तालुकाध्यक्ष निलेश आहिरे, क्षत्रिय मराठा सोसायटीचे अध्यक्ष राजेश येरुणकर यांच्यासह लक्ष्मण मोरे, उद्योजक गोविंद चोरगे, वैभव चांदे तसेच आजी माजी पदाधिकारी कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

या वेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना आमदार दरेकर यांनी, आम्ही महायुतीत आहोत. व्यापक असा विचार करून सत्तेचा उपयोग सर्वसामान्यांसाठी झाला पाहिजे. माझा पोलादपूर तालुका सगळयात विकसित आहे त्या तालुक्याचे गाव आणि गाव रस्त्याने जोडले पाहिजे, पाण्याची व्यवस्था झाली पाहिजे, चांगल्या शाळा, आरोग्य व्यवस्था पाहिजे यासाठी येणाऱ्या काळात निश्चितच नियोजनबध्द काम होईल. आज सरकार आपले आहे. राज्याच्या मुख्यमंत्री यांच्याकडे शब्द टाकला तर येणार याची मला खात्री आहे. त्यामुळे तालुक्याच्या विकासासाठी जे-जे काम लागेल ते आपण सरकारच्या माध्यमातून करून घेऊ, हा विश्वासही आमदार दरेकर यांनी या वेळी व्यक्त केला.

या वेळी ना.भरत गोगावले यांनी, शेतकरी वर्गाने पडीक जागेवर बांबूची लागवड करावी, आ.प्रवीण दरेकर यांच्या मुंबै बँकेचे आर्थिक सहकार्य घेऊन नवीन उद्योग हाती घ्यावेत. पोलादपूरमध्ये आमदार प्रवीणभाऊंना लागेल ते सहकार्य मंत्रीमंडळाच्या माध्यमातून करू आणि तेदेखील जनतेसाठी मुंबई बँक आणि पक्षाच्या माध्यमातून सहकार्य करतील, असे सांगितले. या वेळी ना.गोगावले यांनी, आजही आपल्या तालुक्यातील लोकं मुंबईला हॉटेल, रुग्णालयात, शिपायाची कामे करतात. हे चित्र बदलायला हवे. आपली मुलं एमपीएससी, यूपीएससी, उद्योगपती झाली पाहिजेत, हे स्वप्न बाळगायला हवे. येणाऱ्या काळात महायुती म्हणून या सर्व गोष्टींत लक्ष घालू. येथील राजकीय मंडळींनी राजकीय मतभेद न मांडता सर्वसामान्यांसाठी दिशादर्शक काम केले तर पोलादपूर तालुक्याचे चित्र बदलू शकतो, असे सांगितले.

पोलादपूर तालुक्यातील उद्योजक गोविंद चोरगे यांनी पाण्याचा नवीन प्लांट उभा केला आहे. त्याचा आदर्श तरुणांनी घेत लघुउद्योग उभारावे. त्याचप्रमाणे शेतकरी वर्गाने पडीक जागेवर बांबूची लागवड करावी जेणे करून त्याचा आर्थिक स्तर उंचावत शेतकऱ्यांना उत्पन्न मिळाले त्यासाठी लागणारे सहकार्य मंत्री म्हणून करणार असल्याची ग्वाही ना.भरत गोगावले यांनी दिली.

## 'अवकाळी'ग्रस्त भागाची खासदार धैर्यशील पाटील यांनी केली पाहणी



**पेण : प्रतिनिधी**

वादळी वाऱ्यासह आलेल्या अवकाळी पावसामुळे पेण तालुक्यात नुकसान झाले असून या नुकसानग्रस्त भागाची पाहणी खासदार धैर्यशील पाटील यांनी केली.

या वेळी खासदार धैर्यशील पाटील यांच्यासोबत प्रातांधिकारी प्रवीण पवार, तहसीलदार तानाजी शेजाळ, नायब तहसीलदार प्रसाद कालेकर, माजी जि.प. सदस्य डी.बी. पाटील, वनविभागाचे अधिकारी कुलदीप पाटकर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी व विमा अधिकारी उपस्थित होते.

या वेळी खासदार पाटील यांनी वरसई विभागातील जावळी, निधवली व करोटी गावातील नुकसान झालेल्या घराचे, आंब्याचे आणि विट्टभट्टीदारांचे शेतकच्या नुकसानीची पाहणी करून तातडीने पंचनामे करून अहवाल सादर करावयाचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

## पेण कोपरफाटा येथे एकाची ९० हजारांची फसवणूक

**पेण :** कोपरफाटा येथे एका व्यक्तीची ९० हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दादर सागरी पोलीस ठाणे हद्दीत १ ते २ एप्रिल दुपारी दोन दरम्यान ही घटना घडली आहे. आरोपी यांनी फिर्यादी व फिर्यादी यांचे सोयरे यांचा पॅरेलेसचे आजार पुर्णपणे बरा करतो असे सांगून फिर्यादी यांचे विश्वास संपादन करून त्यांना खोटयानाट्या विधी करुन त्यांचे गळयातील सोन्याची चैन त्यामध्ये बदामाचे आकाराचा पान व फिर्यादी यांची सोयरी यांचे कानातील दोन सोन्याच्या साखळ्या, सोन्याची एक डवली व दोन सोन्याची मणी असा एकूण ९० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने घेवून त्यांनी फिर्यादी व साक्षीदार यांची फसवणूक केली. याबाबत दादर सागरी पोलीस ठाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई पाटील हे करीत आहेत.

## निवडक

### बाळगंगा नदीत मुलगा बुडाला

**खालापूर :** तालुक्यातील वावोशी पोलीस दुर क्षेत्र हद्दीत अमन चौरसिया ८ हा शनिवारी दुपारी ३ वा. सुमारास घरातील कोणालाही न सांगता पोहायला गेला होता, मात्र अंधार होऊनही तो घरी परतला नसल्याने त्याचा शोध घेतला असता त्याच्या बरोबर पोहायला गेलेल्या मुलांनी अमन नदी पात्राच्या बाहेर आला नसल्याचे सांगितले त्याचा नदी पात्रात शोध घेतला असता पाण्यात शव तरंगताना आढळून आले. वावोशी पोलीस दुर क्षेत्र पोलीस उपनिरीक्षक अलोक किस्मतराव आणि त्यांच्या पोलीस पथकाने घटनास्थळी धाव घेत शोध मोहीम राबवली असता शव तरंगताना दिसून आले. ही घटना बाळा गंगा नदीत, जांभवली स्मशान भूमीजवळ घडली.

### हेटवणे वसाहतीत घरफोडी

**पेण :** तालुक्यातील कामार्ली येथील हेटवणे प्रकल्प उपविभाग ५ येथे घरफोडी झाली आहे. पेण पोलीस ठाणे हद्दीत १९ मार्च ते १ एप्रिलदरम्यान ही चोरी झाली. कामार्ली येथील वसाहतीतील रुममध्ये एकूण १५ हजार ७५० रुपये किंमतीचे डॅमचे बांधकाम व लेव्हल चेक करणेकरीता लागणारे जुने साहित्य कोणीतरी अज्ञात इसम याने घरफोडी करून चोरून नेले. याबाबत पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सहाय्यक फौजदार पाटील हे करीत आहेत.

### काराव-गडब उपसरपंचपदाची निवड

**पाली :** पेण तालुक्यातील काराव-गडब ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी मनसेचे पेण तालुका अध्यक्ष मनोहर पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. काराव गडब ग्रामपंचायतीचे उपसरपंच दीपक कोठेकर यांनी राजीनामा दिल्याने मनोहर पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. या निवडणुकीसाठी अध्यासी अधिकारी म्हणुन सरपंच मानसी पाटील यांनी काम पाहीले. या वेळी मनोहर पाटील यांना उपसरपंचपदाची निवड झाल्याबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या.



# विद्यार्थ्यांना वाहनचालकांकडून जनावरांसारखी वागणूक

### रायगड जिल्हा पोलीस अधीक्षकांनी घेतली दखल

**नेरळ : प्रतिनिधी**

शालेय विद्यार्थ्यांना वाहन चालकांकडून जनवरांसारखी वागणूक दिली जात असल्याचा प्रकार व्हायरल व्हिडिओच्या माध्यमातून समोर आला असून हा व्हिडिओ थेट रायगड पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हाती लागल्याने घार्गे यांनी नेरळ पोलिसांना वाहन चालकावर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

याबाबत नेरळ पोलिसांनी घार्गे यांच्या आदेशाचे पालन करीत चालकावर गुन्हा दाखल केला. हा व्हिडिओ नेरळ पूर्व परिसरातील जिंगल प्ले, अभुदय इंटरनॅशनल स्कुल ह्या खासगी शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचां असून वाहन चालकांकडून कशा प्रकारे विद्यार्थ्यांना बसवले जाते याचा हा व्हिडिओ व्हायरल करण्यात आला होता.

नेरळ पूर्व परिसरातील साई हॉस्पिटल धामोते येथे जिंगल प्ले, अभुदय इंटरनॅशनल स्कुल या नावाची नर्सरी आणि पहिली दुसरीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची खाजगी शाळा आहे. ४ एप्रिल रोजी या शाळेतील विद्यार्थ्यांना घेवून जाणारा कोल्हारे गावातील वाहन चालक कल्पेश प्रकाश कराळे याचा एक व्हिडिओ अज्ञात व्यक्तीने काढून तो सोशल मीडियावर व्हायरल करण्यात आला होता. कल्पेश हा बेजबाबदारपणे आपल्या वाहनातून शालेय विद्यार्थ्यांना कशा प्रकारे कोंबून बसवून विद्यार्थ्यांची अवैधरित्या वाहतूक करतो हे दाखवण्यात आले होते. कल्पेश याने वाहनाच्या क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी भरले होते शिवाय, एखाद्या जनावरांसारखी वागणूक या लहान चिमुरड्या मुलांना देण्यात येत असल्याने या व्हिडिओच्या माध्यमातून दाखवण्यात आले होते.

हा व्हिडिओ थेट रायगड पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना ही पाठवण्यात आल्याने सोमनाथ घार्गे यांनी लागलीच याची दखल घेत याबाबत घटनेची तपासणी करून तात्काळ कडक कारवाईचे आदेश नेरळ पोलिस ठाण्याचे पोलीस अधिकारी शिवाजी ढवळे यांना दिले होते.त्यानुसार नेरळ पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी शिवाजी ढवळे यांनी वाहन चालक कल्पेश प्रकाश कराळे या व्यक्तिविरूध्द नेरळ पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं.५६/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम १२५ सह मोटार वाहन कायदा कलम ६६(१) १९२ प्रमाणे गुन्हा नोंद करून त्याला ताब्यात घेण्यात आले होते.दरम्यान, अशा प्रकारे कोणीही शाळकरी मुलांचे जीवीतास धोका निर्माण होईल हे कृत्य करू नये व विनापरवाना अवैध वाहतुक करू नये म्हणून नेरळ पोलिसांकडून सूचना करण्यात आल्या आहेत.

# पेण नगर परिषदेची ११ कोटी २४ लाख रुपयांची करवसुली

**पेण : प्रतिनिधी**

पेण नगर परिषदेचे मुख्याधिकारी जीवन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासनाने यावर्षी मालमत्ता कर वसुलीवर जोरदार भर दिला होता. कर वसूलीचे शंभर टक्के टार्गेट पूर्ण करण्यासाठी प्रशासनाची टीम घाम गाळीत असताना गतवर्षी पेक्षा एक कोटीची जास्त रक्कम मार्च अखेरपर्यंत जमा झाली.

यंदाच्या आर्थिक वर्षांत ३१ मार्चपर्यंत शंभर टक्के मालमत्ता कर वसूली करण्याचे उद्दिष्ट वसूली विभागातील सहाय्यक अधिकारी गोविंद भिसे, सहाय्यक अधिकारी महेश वडके व कर्मचारी वर्गान नजरेसमोर ठेवले होते. ते यशस्वी करण्यात आले आहे. तब्बल ११ कोटी २४ लाख कराची रक्कम तिजोरीत जमा झाल्याने मुख्याधिकारी जीवन पाटील यांनी लेखापाल किरण



शाह, कर निरीक्षक अमोल नाप्ते सहाय्यक अधिकारी गोविंद भीसे, वसूलीविभाग प्रमुख महेश वडके व सर्व गटप्रमुखाचे कौतुक केले आहे.

आर्थिक वर्ष संपायला दहा दिवस असताना १० कोटी २० लाख कराची रक्कम जमा झाली होती. त्याची टक्केवारी ८५ टक्के होती. दिलेले एकुण १२ कोटी चार लाख कराच्या रकमेपैकी ११कोटी २४ लाख रुपये अशी ९३ टक्के रक्कम पालिकेच्या तिजोरीत रक्कम जमा झाली आहे. पाणीपट्टीची एक कोटी ६८ लाख २३ हजार ४८ रुपये ८६.७७ टक्के पाणीपट्टीची वसूली झाली आहे. याशिवाय शिक्षण कर आणि इतर सर्व करांचा या ९३ टक्के करामधे समावेश आहे. पालिकेच्या मालमत्ता कर संकलन विभागाने चांगलीच कसरत करीत ही वसूली मोहीम यशस्वी केली आहे.

नवनवीन फंडे आणि चौकाचौकात रिक्षामधून ध्वनीक्षेपकावरून दवंडीद्वारे जनजागृती, वसूली पथकातील कर्मचारी वर्गाच्या गृहभेटी यामुळे सजगतेने पेण शहरातील नागरिकांनी आपआपली मालमत्ता कराची रक्कम भरण्यावर भर देत चांगल्या प्रकारे पेण पालिका प्रशासनाला सहकार्य केले या सर्व करदात्यांचे मनापासून सहकार्यामुळे ही कामगिरी वसूली विभागाला करता आली. यासाठी सहाय्यक अधिकारी व कर्मचारी वर्गाचे जीवन पाटील मुख्याधिकारी पेण नगर परिषद यांनी अभिनंदन केले.

# वावंढळवाडी येथे श्रीराम नवमीनिमित्त धार्मिक कार्यक्रम

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील वावंढळवाडी येथे श्री राम मंदिरात श्रीराम नवमी निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. समारोप कीर्तनात ज्येष्ठ कीर्तनकार हभप प्रवीणमहाराज फराट किर्तनरुपी सेवेतून बोलत होते.

देवाला पाहण्याचा प्रयत्न केला तरी तो दिसत नाही, मात्र भक्तांच्या संकटाला तो धाऊन येतो, म्हणूनच मत्स्य कूर्म वराह हे देवाचे अवतार भक्तांसाठी देवाने धारण केले आहेत, असे निरूपण जेष्ठ कीर्तनकार हभप प्रवीणमहाराज फराट यांनी केले आहे.

ते पुढे म्हणाले संस्कृती, वीरता, तत्वे, नैतिकता, सुशासन, नम्रता आणि त्यागाचे उदाहरण म्हणजे श्रीराम चैत्र शुद्ध नवमी हा हिंदू पंचागानुसार चैत्र महिन्यातील नवरात्राचा नववा दिवस आहे. या तिथीस भगवान विष्णूचा सातवा अवतार समजले गेलेले श्री राम यांचा जन्म झाला, अशी मान्यता आहे. हा दिवस श्री रामनवमी म्हणून साजरा करतात.

रामनवमी हा त्रेता युगात अयोध्येत श्री रामचंद्रांच्या अवताराचे स्मरण करणारा एक हिंदू



सण आहे. वैदिक शास्त्रानुसार भगवान कृष्ण किंवा भगवान विष्णू रामचंद्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रिय अवताराच्या रूपात प्रकट झाले, संस्कृती, वीरता, तत्वे, नैतिकता, सुशासन, नम्रता आणि त्यागाचे उदाहरण देणाऱ्या विविध लीलांमध्ये सहभागी झाले. हभप कमलाकर काईनकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपसरपंच ललिता रामदास काईनकर यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

# पेण तालुक्यात जिवंत सातबारा मोहीम

### राज्य शासनाच्या उपक्रमाला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पेण : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन व वनविभाग महसूल विभागातर्फे १०० दिवस कृती कार्यक्रम आराखड्या अंतर्गत जिवंत सातबारा मोहिमेचे आयोजन करण्यात आले असून या उपक्रमात जवळजवळ ६५० ते ७०० मयत सातबारा शोधण्याचे काम महसूल विभागातर्फे करण्यात आले आहे.

सातबारावरील गावातील सर्व मयत खातेदारांच्या वारसांच्या नोंदींची प्रक्रिया पूर्ण करावयाची असल्याने मयत खातेदार यांच्या वारसांना शेतजमिनीच्या अनुषंगाने विविध दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांमध्ये वारसांची नोंद



विहित कालावधीत अधिकार अभिलेखांमध्ये नोंद न झाल्यास अडचणींना सामोरे जावे लागेल. या दृष्टिकोनातून जिवंत सातबारा मोहीम राबविण्याचा निर्णय शासन स्तरावर घेण्यात आला असल्याने तालुक्यात ठिकठिकाणी जिवंत सातबारा मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी ग्रामपंचायत उपविभागीय अधिकारी पेण प्रविण पवार व तहसीलदार पेण तानाजी शेजाळ यांनी माहिती देऊन उपस्थित शेतकऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. या वेळी काराव सरपंच मानसी पाटील, मंडल अधिकारी भक्ती चव्हाण, ग्राम महसूल अधिकारी काराव-खारढोंबी संजय शिंगे, माधुरी साबळे, विशाल दिंडे, कृषि सहाय्यक प्राजक्ता बारवे तसेच शेतकरी खातेदार उपस्थित होते.

# व्यवसायातील उदयोन्मुख ट्रेंड व व्यवस्थापनावर चर्चासत्र

**मुरुड : प्रतिनिधी**

अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स मुरूड जंजिरा, वीर वाजेकर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय उरण, कला आणि वाणिज्य महाविद्यालय खारेपटण आणि अंजुमन इस्लाम जंजिरा वाणिज्य महाविद्यालय श्रीवर्धन यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि.५) व्यवसायातील उदयोन्मुख ट्रेंड आणि व्यवस्थापन यावर ऑनलाईन राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

या राष्ट्रीय ई-चर्चासत्राचे उद्दिष्ट शिक्षणतज्ज्ञ, संशोधक आणि उद्योग व्यावसायिकांना वाणिज्य आणि व्यवस्थापनातील त्यांचे संशोधन निष्कर्ष आणि




अंतर्दृष्टी देवाणघेवाण करणे. तसेच या चर्चासत्रात व्यवसाय धोरणे, आर्थिक व्यवस्थापन, विपणन, डिजिटल परिवर्तन, उद्योजकता आणि संघटनात्मक विकास यासारख्या क्षेत्रातील उदयोन्मुख ट्रेंड, आव्हाने आणि संधींवर चर्चा करण्यात आली.

या चर्चासत्राचे आयोजन प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख, प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर, प्राचार्य डॉ. आत्माराम कांबळे आणि प्रभारी प्राचार्य डॉ. दानिश संगे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या कार्यक्रमाची प्रस्तावना डॉ. साजिद शेख आणि डॉ. आमोद ठक्कर यांनी सादर केली. राष्ट्रीय चर्चासत्राची सुरुवात मुंबई विद्यापीठाचे वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. संगीता पवार यांच्या व्याख्यानाने झाली.

या सत्राचे अध्यक्ष स्थान डॉ. प्रेम भगवान आचार्य यांनी भूषवले आणि आभार प्रा. वसीम सय्यद यांनी मानले. या चर्चासत्राचे पहिले निमंत्रित व्याख्यान अबिदा इनामदार महाविद्यालयाचे डॉ. मुल्ला महंमदीनुष यांनी केले. या सत्राचे अध्यक्ष स्थान डॉ. के एच सानप यांनी भूषवले आणि आभार प्रदर्शन डॉ. दानिश संगे यांनी केले. या चर्चासत्राचे दुसरे निमंत्रित व्याख्यान गुवाहाटी वाणिज्य महाविद्यालय आसामचे डॉ. गोर गोपाल बानिक यांनी केले, या सत्राचे अध्यक्षस्थान डॉ. आमोद ठक्कर यांनी केले व आभार डॉ. गुरमीत वाधवा यांनी मानले.

या चर्चासत्रामध्ये १०० हून अधिक संशोधकांनी सहभाग घेतला आणि ५० शोधनिबंध सादरीकरण व संकलित करण्यात आले. सादरीकरणाचे परिक्षण डॉ. धीरज ओव्हाळ, डॉ. प्रेम आचार्य, डॉ. तृप्ती थोरात आणि डॉ. दिवाकर कदम यानी केले. या परिषदेच्या आयोजनासाठी प्रा. भूषण ठाकूर, प्रा. अल्ताफ फकीर,प्रा. मधीहा रज्जब, प्रा. डॉ. गुरमीत वाधवा, प्रा.वसीम सय्यद, प्रा. निखत राजपुरकर आणि चारही महाविद्यालयाचे प्राध्यापक आणि विद्यार्थी प्रतिनिधी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# राजस्थानचा पंजाबवर एकतर्फी विजय



**मुल्लानपूर : वृत्तसंस्था**

राजस्थान रॉयल्सने आयपीएलमध्ये सलग दुसरा विजय नोंदवला आहे. या संघाने मोसमातील चौथ्या सामन्यात पंजाब किंग्जचा त्यांच्याच घरच्या मैदानावर एकतर्फी ५० धावांनी पराभव केला. पंजाबला या मोसमात पहिल्या पराभवाचा सामना करावा लागला.

या सामन्यात यजमान पंजाब किंग्ज संघ शानदार फॉर्मसह उतरला होता. नवा कर्णधार श्रेयस अय्यर आणि नवे प्रशिक्षक रिकी पॉँटिंग यांच्या नेतृत्वाखाली पंजाब संघाने मोसमातील पहिले दोन सामने एकतर्फी जिंकले, तर राजस्थानने सुरुवातीचे दोन्ही सामने गमावले होते, पण त्यांनी विजयी घोडदौड सुरू केली आहे.

पंजाब किंग्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. राजस्थानने प्रथम फलंदाजी करीत पंजाबला विजयासाठी २०७ धावांचे आव्हान दिले होते. लक्ष्याचा पाठलाग करताना पंजाबची सुरुवात खूपच खराब झाली. पहिल्याच षटकात जोफ्रा आर्चरने दोन मोठ्या विकेट्स घेतल्या. पहिल्याच चेंडूवर आर्चरने प्रियांश आर्यला क्लीन बोल्ड केले, तर अखेरच्या चेंडूवर फॉर्मात असलेल्या कर्णधार श्रेयस अय्यरलाही क्लीन बोल्ड करत पंजाबला धक्के दिले.

यानंतर मार्कस स्टॉयनिस स्वस्तात बाद झाला, पण नेहल वढेराने ४१ चेंडूत चार चौकार आणि तीन षटकारांसह ६२ धावांची शानदार खेळी केली, तर मॅक्सवेल ३० धावा करत बाद झाला. यानंतर कोणत्याच फलंदाजाला चांगली कामगिरी करता आली नाही. राजस्थानकडून आर्चरने चार षटकांत २५ धावा देत तीन विकेट्स घेतल्या. संदीप शर्मा, महिश तीक्ष्णा यांनी प्रत्येकी दोन, तर कुमार कार्तिकेय, हसरंगाने प्रत्येकी एक एक विकेट घेतली.

तत्पूर्वी या सामन्यात राजस्थान रॉयल्सने प्रथम फलंदाजी केली होती. कर्णधार संजू सॅमसन-यशस्वी जैस्वाल या सलामीच्या जोडीने अवघ्या १०.२ षटकांत ८९ धावांची भागीदारी केली. गेल्या तीन सामन्यात सपशेल अपयशी ठरलेल्या यशस्वीने अखेर आपले कौशल्य दाखवत मोसमातील पहिले अर्धशतक झळकावले. यानंतर रियान परागने अवघ्या २५ चेंडूत ४३ धावांची तुफानी खेळी करीत संघाला २०० धावांच्या पुढे नेले. पंजाबने यादरम्यान काही झेलही सोडले, ज्याचा फायदा राजस्थानला मिळाला. राजस्थानने २० षटकांत चार गडी गमावून २०५ धावा केल्या. पंजाबकडून वेगवान गोलंदाज लॉकी फर्ग्युसनने सर्वाधिक दोन विकेट्स घेतल्या.

# विचुंबेत कबड्डी स्पर्धा उत्साहात





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विचुंबे ग्रामपंचायतीचे सरपंच प्रमोद भिंगारकर यांच्या वाढदिवसानिमित्त रायगड जिल्हास्तरीय भव्य कबड्डी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन खेळाडूंना प्रोत्साहित केले तसेच सरपंच प्रमोद भिंगारकर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

विचुंबे ग्रामपंचायतीसमोरील विठ्ठल रखुमाई मैदानात झालेल्या या स्पर्धेचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते झाले. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते उत्कृष्ट शरीरसौष्ठवपटू महिला आणि पुरुषांचा सत्कार करण्यात आला.

प्रमुख मान्यवर म्हणून भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, अनुसूचित जाती सेल जिल्हाध्यक्ष अमित जाधव, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, किशोर सुरते, के.सी. पाटील, रवींद्र भोईर, माजी सरपंच बळीराम पाटील, अनुसूचित जाती मोर्चाचे पनवेल ग्रामीण अध्यक्ष अविनाश गायकवाड, नमन भिंगारकर, संजीत भिंगारकर, डी.के. भोईर, प्रल्हाद भोईर, जगदीश भोईर, राम म्हात्रे, चेतन भिंगारकर, निलेश म्हात्रे, संदीप पाटील, चेतन सुरते, आनंद गोंधळी, विवेक भोईर, गुरुनाथ म्हात्रे, आप्पा गायकवाड, स्वाती पाटील, अनिल भोईर, व्ही. डी. पाटील, श्रावणी भोईर, आरती गायकवाड, प्रगती गोंधळी, विभूती सुरते यांच्यासह पदधिकारी, कार्यकर्ते, खेळाडू उपस्थित होते.

## गोलंदाजाने चेंडू फेकला अन् अख्ख्या स्टेडियमची बत्ती गुल!



**माउंट मानुगाउई : वृत्तसंस्था**

माउंट मानुगाउई येथील बे ओव्हल मैदानात पाकिस्तान आणि यजमान न्यूझीलंड यांच्यात झालेल्या एकदिवसीय सामन्यादरम्यान अचानक वीजपुरवठा खंडित झाला. त्यामुळे सगळीकडे अंधार झाला.

पाकिस्तानच्या डावादरम्यान ३९व्या षटकात तय्यब ताहिर याला गोलंदाजी करण्यासाठी न्यूझीलंडचा जॅकब डफी धावत आला. या वेळी ताहिरने स्टान्सदेखील घेतला, मात्र डफीने चेंडू टाकला आणि अगदी त्याच क्षणाला वीज गेली. अंधार झाल्याने या चेंडूमुळे ताहिरला इजा होण्याची शक्यता होती, पण क्रीज सोडल्याने त्याला कुठलीही दुखापत झाली नाही.

भरसामन्यात स्टेडियमवरील दिवे अचानक बंद झाल्याच्या या घटनेचा व्हिडीओ व्हायरल होत आहे. सोशल मीडियावर लोक तो शेअर करीत आहेत.

## ‘महेंद्रसिंह धोनीने आयपीएल २०२३नंतर निवृत्त व्हायला हवे होते’

**चेन्नई : वृत्तसंस्था**

इंडियन प्रीमअर लीगमधील चेन्नई सुपर किंग्ज संघ आणि महेंद्रसिंह धोनी हे एक समीकरण झाले आहे, मात्र यंदाच्या आयपीएलमध्ये धोनीची कामगिरी तुलनेने निराशाजनक झाली आहे. त्याच्या या कामगिरीवर एकेकाळी ‘सीएसके’कडून खेळलेला आणि टीम इंडियाचा माजी क्रिकेटपटू मनोज तिवारी याने बोचरी टिप्पणी केली आहे.

धोनीने यंदाच्या आयपीएलमध्ये चार सामने खेळले असून केवळ ७६ धावा केल्या आहेत. चाहते आणि क्रिकेट विश्लेषक त्याच्या फलंदाजीच्या क्रमवारीबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहेत. शनिवारी दिल्लीविरुद्ध धोनी सातव्या क्रमांकावर फलंदाजीला आला. त्याने २६ चेंडूत केवळ ३० धावा केल्या. सीएसकेला सलग तिसरा पराभव पत्करावा लागला.

या संदर्भात मनोज तिवारी ‘क्रिकबझ’शी बोलताना म्हणाला की, मला वाटते की त्याच्या निवृत्तीची योग्य वेळ २०२३मध्ये होती, कारण त्याने आयपीएल ट्रॉफी जिंकली होती. तेव्हा त्याने निवृत्त व्हायला हवे होते. मला वाटते की, गेल्या दोन वर्षांत तो ज्या पद्धतीने खेळत आहे यावरुन क्रिकेटमधून त्याने मिळवलेली सर्व प्रसिद्धी, कमावलेले नाव आणि आदर कमी होत चालले आहे. आयपीएल क्रिकेट चाहते त्याला अशा प्रकारे खेळताना पाहू शकणार नाहीत. त्याची चमक कमी होत चालली आहे.

धोनी १० षटकांपेक्षा जास्त फलंदाजी करू शकत नाही, असे विधान स्टीफन फ्लेमिंग यांनी केले होते. यावर बोलताना मनोज तिवारी म्हणाला की, माजी क्रिकेटपटूचा असा विश्वास आहे की, निर्णय संघाच्या हितासाठी घेतले जात नाहीत. कोणीतरी पुढे येऊन व्यवस्थापनाला प्रयोग थांबवण्यास सांगावे लागेल.

## मुंबई इंडियन्सला दिलासा; जसप्रीत बुमराह संघात दाखल



**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्ससाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. मुंबई संघाचा मुख्य खेळाडूंपैकी एक असलेला जसप्रीत बुमराह दुखापतीतून सावरला असून तो रॉयल्स चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्धच्या सामन्यापूर्वी मुंबई इंडियन्सच्या ताफ्यामध्ये दाखल झाला आहे.

याबाबतची माहिती मुंबई इंडियन्सने त्याच्या सोशल मिडीया हँडलवर एक व्हिडीओ शेअर करत दिली आहे. ७ एप्रिल रोजी मुंबई इंडियन्सचा सामना त्यांच्या घरच्या मैदानावर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूशी होईल. तथापि, बुमराह आरसीबीविरुद्ध मुंबई इंडियन्सच्या प्लेइंग इलेव्हनचा भाग होऊ शकेल की नाही याबद्दल अजूनही सस्पेन्स आहे.

पाठीच्या शस्त्रक्रियेनंतर बुमराह बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सलन्स येथे सराव करत होता. तो १३ एप्रिल रोजी दिल्ली कॅपिटल्सविरुद्धचा सामना खेळू शकतो असे मानले जाते.





**पनवेल : प्रथम राष्ट्र, नंतर संघटन आणि शेवटी स्वतः या विचारसरणीनुसार कार्यरत असलेल्या भारतीय जनता पक्षाचा ४६वा स्थापना दिन रविवारी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या अनुषंगाने राज्याचे कार्यकुशल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ऑनलाईन मार्गदर्शन करून संबोधित केले.**












दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com